दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड ☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड ☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -७५ | गुरूवार दि.२० नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-75 | Thursday, Dt.20 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# राष्ट्रवादी काँग्रेसने नगराध्यक्षाचा उमेदवार मुजीब शेख यांची सासू म्हणून दिला

## राष्ट्रवादीच्या उमेदवार प्रेमलता पारवे या भ्रष्ट आणि लाचखोर, मोठ्या आर्थिक व्यवहारातून उमेदवारी दिली - पप्पू कागदे



बीड /प्रतिनिधी

बीड नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी (अजित पवार गट) कडून झालेल्या दगा फटक्याचा पर्दाफाश करत युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी प्रस्थापित पक्षांवर जोरदार प्रहार करित अशा प्रवृत्तिंच्या विरोधात आज (दि.१९) नोव्हेंबर २०२५ रोजी बीड शहरातील आंबेडकरवादी सर्वपक्षीय संघटनांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची संयुक्त पत्रकार परिषद हॉटेल नीलकमल येथे घेऊन त्यांनी तिकीट वाटपातील गैरव्यवहार, माफिया हस्तक्षेप आणि समाजाला डावलण्याचा कट असल्याचा थेट आरोप केला.

### आता घड्याळाला एकही मत नाही..!

या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी अजित पवार गटाला, एकही मत नाही, अशी ठाम भूमिका आंबेडकरी समाजाने घेतली आहे. त्यासाठी येत्या२५-२६ नोव्हेंबर रोजी प्रस्थापितांना नगर परिषद निवडणूकीत धडा शिकविण्यासाठी बीड शहरातील आंबेडकरी चळवळीतील सर्वपक्षीय पदाधिकारी व्यापक बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल.

### नोटीस संदर्भात कागदे यांचा पोलीस प्रशासनालाही थेट इशारा...

पोलीस अधीक्षकांनी नाहक नोटिसा धाडण्याचे नाटक थांबवावे. आधी शहरातील मटका, जुगार, वेश्या व्यवसाय, पत्ते क्लब यावर कठोर कारवाई करा. सरकारच्या दबावाखाली आंबेडकरी जनतेला त्रास देऊ नका असा थेट इशारा पोलिस अधीक्षक आणि पालकमंत्री अजित दादा पवार यांना दिला आहे.

### अजिंक्य चांदणे
### मागासवर्गीयांना वंचित ठेवण्याचे षडयंत्र

या पत्रकार परिषदेत अजिंक्य चांदणे म्हणाले, मागासवर्गीयांना चाळीस वर्षानंतर आरक्षणाच्या माध्यमातून नगर अध्यक्षपदाची संधी मिळाली होती. परंतु राजकीय प्रस्थापितांकडून मागासवर्गीयांना वंचित ठेवण्याचे षडयंत्र करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेमुळे बीडचे राजकीय वातावरण आणखी तापले असून प्रस्थापित पक्षांवर आंबेडकरी समाजाचा रोष तीव्र झाला आहे.

### पोलीस प्रशासनाने आंबेडकरी चळवळ दाबण्याचा प्रयत्न केल्यास रस्त्यावर उतरू - बबनराव वडमारे

आंबेडकर चळवळीमध्ये अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे रिपाईचे नेते पप्पू कागदे यांना जाणीवपूर्वक राजकीय दबावाला बळी पडून पोलीस अधीक्षक बीड यांनी बेकायदेशीरपणे नोटीस बजावली आहे. जर पप्पू कागदे यांच्या विरोधात पोलीस प्रशासनाने काही बेकायदेशीर रित्या कारवाई करण्याचा प्रयत्न केला तर तमाम आंबेडकरी जनता रस्त्यावर उतरून पोलीस प्रशासनाला जाब विचारेल.यावेळी जर काही अनुचित प्रकार घडले तर त्याला पोलीस प्रशासन जबाबदार असेल. असा थेट निर्वाणीचा इशारा या पत्रकार परिषदेत ज्येष्ठ आंबेडकर चळवळीतील नेते बबनराव वडमारे यांनी दिला.

### नगरपालिका सह येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीमध्ये सुद्धा इंगा दाखवणार

मला उमेदवारी डावल्ली याचा राग नाही. मात्र स्वाभिमानी आंबेडकर चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्याचा अवमान करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शेख मुजीब यांची सासू म्हणून पात्रता नसताना सुद्धा उमेदवारी दिली. आमच्या जातीचा वापर जर कोणी ठेवलेली म्हणून करणार असेल तर अशा प्रवृत्तीला प्रखर विरोध करण्यासाठी संपूर्ण आंबेडकर प्रेमी जनता या विचाराच्या विरोधात जाब विचारेल. केवळ बीड नगरपालिकेतच नाही तर याचे परिणाम पंडितांना गेवराई नगरपालिका निवडणुकीत आणि येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये सुद्धा भोगावे लागतील. इतकेच नाही तर पंडितांसह पालकमंत्री अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला याचे परिणाम भोगावे लागतील असा थेट इशारा पप्पू कागदे यांनी पत्रकार परिषदेत दिला.

### मागासवर्गीयांवर अन्याय करणाऱ्या पंडितांची राजेशाही बीडच्या वेशीबाहेर फेकू

या संयुक्त पत्रकार परिषदेस युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे, डीपीआय प्रदेश अध्यक्ष अजिंक्य चांदणे,वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, बबन वडमारे, ज्ञानोबा माने, रवी वाघमारे, अड. देवदत्त शिंदे, अशोक सोनवणे, राजू जोगदंड, मझर खान, सिद्धार्थ शिंगारे यांच्यासह दलित पक्ष, संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

पप्पू कागदे म्हणाले, मी स्वतः निवडणूक लढण्यास तयार नव्हतो. समाज, कार्यकर्त्यांनी विनंती केली म्हणून जबाबदारी घेतली. पण मी कोणाच्याही दारात तिकीट मागायला गेलो नव्हतो. मला त्यांनीच बोलावलं. आ. विजयसिंह पंडित यांनी सांगितले की अजित दादा पवार यांचा निरोप असून निवडणूक लढवावी अशी विनंती केली आहे.त्यानंतर रामदास आठवले यांच्याशी चर्चा करून सर्व तांत्रिक अडचणी दूर करुन घड्याळ या चिन्हावर लढायला तयार झालो. परंतू प्रस्थापितांचा डाव वेगळाच होता. आमचा वापर करून शेवटच्या क्षणी माझी उमेदवारी कापली. खऱ्या एससी महिलेला तिकीट न देता मुजीब शेख यांच्या सासूला तिकीट देणे म्हणजे समाजाचा उघड अपमान आहे. ही निवडणूक नाही, हा डुप्लिकेट खेळ आहे. तिकीट वाटपात मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करत कागदे म्हणाले

भू-माफिया, वाळू-माफिया आणि वक्फ बोर्डाच्या जमीन व्यवहारांसाठी घुसखोरी केली गेली. पैसा आणि दबाव तंत्रांचा वापर करून घड्याळ चिन्हाच्या तिकीटाचा लिलाव केले. भूमाफियांना उमेदवारी देवून नगर परिषद ताब्यात घेण्यासाठी व वक्फ बोर्डाच्या असलेल्या जमिनी भू माफियांच्या नावे करण्यासाठी प्रस्थापितांकडून मागासवर्गीय उमेदवारांना निवडणूक लढण्यापासून दूर ठेवण्याचे काम करण्यात येत आहे. अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे थेट नाव घेवून म्हणाले की, बीडमध्ये राजेशाही चालणार नाही. लोकशाहीच्या नावाखाली डावपेच करणाऱ्यांना आम्ही वेशीबाहेर टाकू. समाजावर कुणीही मनमानी लादू शकत नाही.

### शिंदे सेना आणि मेटेंची शिवसंग्राम झाली राष्ट्रवादीमय ?

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने नगराध्यक्ष सह सर्व ५२ जागेवर घड्याळ या चिन्हावर उमेदवार दिल्याचे पत्रकार परिषदेत जाहीर केले होते. यामुळे आता शिंदे शिवसेनेला आणि मेटे यांच्या शिवसंग्रामला ज्या काही दोन-चार जागा दिल्या त्या उमेदवारांना सुद्धा घड्याळ हे चिन्ह राष्ट्रवादीचे घेऊन निवडणूक लढवावी लागणार आहे. त्यामुळे बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत शिंदेंची शिवसेना आणि मेटे यांची शिवसंग्राम आता राष्ट्रवादीमय झाली आहे. ते घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवणार असल्यामुळे त्यांना देखील आंबेडकर प्रेमी नागरिकांचा रोष सहन करावा लागणार आहे.

# प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक तत्कालीन शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे निलंबित

बीड /प्रतिनिधी

भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (प्राथ), जि.प.बीड यांनी सदर पदावर कार्यरत असताना त्यांच्या विरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये त्यांच्याकडून कांही प्रकरणी अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाले असून, सदर चौकशीचा अंतरिम अहवाल चौकशी समितीने आयुक्त (शिक्षण), पुणे यांना दि.१६.१०.२०२५ च्या पत्रान्वये सादर केला आहे. त्यानुषंगाने संदर्भीय पत्रान्वये आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी श्री. फुलारी यांच्या निलंबनाची शिफारस केली आहे.

ज्याअर्थी, श्री. फुलारी यांच्याविरुध्द शासन स्तरावर / क्षेत्रीय स्तरावर प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय शिक्षण उपसंवालक, छ. संभाजीनगर यांच्याकडून कांही प्रकरणी चौकशीची वैयक्तिक मान्यता प्रकरणांच्या सुनावणीची कार्यवाही सुरू आहे. त्यानुषंगाने, श्री. फुलारी यांच्याविरुध्द शासनाने शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे योजिले आहे.

ज्याअर्थी, आता शासन, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ च्या पोटकलम (१) (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन, श्री. भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प.बीड यांना तात्काळ शासन सेवेतून निलंबित करीत आहेत.

आणखी असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश अंमलात असेल तेवढया कालावधीत उक्त श्री. भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (प्राथ), जि.प.बीड यांचे मुख्यालय शिक्षणाधिकारी (प्राथ) यांचे कार्यालय, जि.प. बीड हे राहील आणि उक्त श्री.

(उर्वरीत पान २ वर)

### फुलारी आणि शिंदे दोघांनी शिक्षक भरतीमध्ये केला ५०० कोटी पर्यंत घोटाळा..?

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नागनाथ शिंदे यांनी शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये व फरक देयके अंदाजे ४०० ते ५०० कोटी रुपयाच्या केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी पूर्ण होत नाही, तोपर्यंत संबंधीत शिक्षणाधिकारी यांची बदली करण्यात येऊ नये याबाबत..

उपरोक्त विषयांकित प्रकरणी अध्यक्ष, भ्रष्टाचार निर्मुलन समिती, महाराष्ट्र राज्य यांनी दि.१६ व १७.०४.२०२५ च्या पत्रान्वये बीड जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी (प्राथ.) श्री. भगवान फुलारी व शिक्षणाधिकारी (माध्य.) श्री. नागनाथ शिंदे हे रूजू झाल्यापासुन शिक्षण विभागामध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरू आहेत. यामध्ये खाजगी शिक्षण संस्था व अल्पसंख्यांक शिक्षण संस्था अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शाळांमध्ये शासनाचे सर्व नियम डावलून संस्था चालकांकडुन आर्थिक देवाण घेवाण करून शिक्षक पदभरती करणे तसेच शिक्षकांना कायम मान्यता देणे अशा प्रकारची बेकायदेशीर कामे करून करोडो रूपयांचा भ्रष्टाचर केलेला असल्याबाबत शासनास तक्रार दाखल केली असून याप्रकरणाची चौकशी होत नाही, तोपर्यंत सदर अधिकारी यांना अन्यत्र बदली न देण्याबाबत विनंती केली आहे.



दिंद्रुड पोलीस स्टेशन हद्दीत वाळूची चोरटी वाहतूक करणारे दोन वाहने जप्त


# बारा लाखाचा मुद्देमाल जप्त

बीड ।प्रतिनिधी

दि. १८/११/२०२५ रोजी दिंद्रुड पोलीस स्टेशन हद्दीत वाळूची विनापरवाना चोरटी वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर यशस्वी कारवाई करून एकूण अडीच ब्रास वाळू आणि दोन वाहने असा मिळून १२,१५,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच दोन्ही घटनांमध्ये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिल्या घटनेत दिनांक १८/११/२०२५ रोजी २१.१५ वा. हॉटेल बप्पाश्री जवळ, आनंदगाव ते लोनगाव रोड वर पांढऱ्या रंगाचे क्रमांक नसलेले पिकअप वाहनात आरोपी: जितीन राजेभाऊ पौळ, वय ३२ वर्षे, रा. खरात आडगाव हा एक ब्रास वाळू किंमत ६,०००/- ची अवैधरित्या वाहतूक करतांना मिळून आल्याने त्याच्या ताब्यातील पिकअप वाहन

(उर्वरीत पान २ वर)



# स्वस्तात विमानाची तिकिटे काढून देतो अशी बतावणी करुन २५ लाखांची

### फसवणूक करणाऱ्याला लोणावळ्यात बीडच्या डी बी पथकाने केली अटक

बीड ।प्रतिनिधी

स्वस्तात विमानाची तिकिटे काढून देतो अशी बतावणी करून २५ लाखांची फसवणूक करणारा लोणावळ्यातून अटक. बीड शहर डीबी पथकाची मोठी धाडसी कारवाई केली आहे.बीड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली होती की, तक्रारदार अण्णासाहेब गोटीराम राठोड यांचा मुलगा विदेशात शिक्षणासाठी राहत असून, त्याच्या येण्या-जाण्यासाठी विमानाची तिकिटे स्वस्तात मिळवून देतो अशी खात्री देत आरोपी कुणाल भाऊसाहेब चव्हाणके, वय २९ वर्ष, रा. चासनळी, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर याने तक्रारदाराची तब्बल २५,००,००० इतकी फसवणूक केली होती.

गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी हा फरार होता आणि बराच काळ सापडत नव्हता. बीड शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने तातडीने तपास सुरू करून, तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपीचा शोध लावून आरोपीला लोणावळा जिल्हा पुणे ग्रामीण येथून ताब्यात घेवून अटक करण्यात यश मिळवले आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस

(उर्वरीत पान २ वर)

# विजय सर्जेराव देशमुख यांचा सेवापुर्ती गौरव समारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये संपन्न



बीड ।प्रतिनिधी

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये या विद्यालयाचे शिक्षक विजस सर्जेराव देशमुख यांचा नियत वयोमानानुसार ५८ वर्षे पूर्ण झाल्या बद्दल सेवापुर्वी गौरव आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष बी. एस. धुतालमल, सचिव ॲड.व्ही.बी. मगर, संचालक राम शिंदे, लक्ष्मण शिंदे, माजी मुख्याध्यापक व्ही. जी. आवाड या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सपत्नीक शाल, पेहराव, साडी, पुष्पगुच्छ आणि पुष्पहार देवुन त्यांचा हृदय सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान्यवरांचे आणि विजय देशमुख यांच्या आप्तस्वकीय आणि हितचिंतकाचे स्वागत विद्यालयाच्या वतीने करण्यात आले. तसेच याप्रसंगी बी.एस. धुतालमल, ॲड.व्ही.बी.मगर, व्ही.जी. आवाड, आणि बी.ए.हावळे तसेच कु. आर्या गालफाडे आणि चि.प्रद्युम्न घुले या विद्यार्थ्यांनी विजय देशमुख यांच्या आप्तस्वकीय श्रीमती शितल सुनिल जाधव (देशमुख) यांनी विजय देशमुख यांच्या कार्याचा गौरव करून पुढील शुभेच्छा देवुन मनोगत प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक बी.ए.हावळे, संचालन श्रीमती एन.जी.मुंडे आणि आभार प्रदर्शन डब्ल्यु. एस. वाघमारे यांनी केले. याप्रसंगी विजय देशमुख यांनी आपले मनोगत प्रतिपादन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी या विद्यालयाचे शिक्षक आर.बी.घुले, यु.बी.पवळ यांनी प्रयत्न केले. या प्रसंगी आनंद छात्रालयाचे अधिक्षक डी.व्ही.खरसाडे, विजय देशमुख यांचे सर्व आप्तस्वकीय, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, एल.बी.हजारे, सुभाष गायकवाड, भारत कोळेकर, बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप केल्यानंतर आणि सामुहिक राष्ट्रगीत गायन झाल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## संपादकीय

# न्यायाची ऐशी-तैशी

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना ढाक्यातील आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधीकरणाने फाशीची सोमवारी शिक्षा सुनावली. हे अपेक्षितच होते. त्यात धक्कादायक असे काहीही नाही. शेख हसीना यांची बांगलादेश न्यायालयाने निर्दोष सुटका केली असती, तर कदाचित ते जगातील आठवे आश्चर्य गणले गेले असते. शेख हसीना यांच्या निकालाला फेब्रुवारी २०२६ मध्ये होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकांची पार्श्वभूमीही आहे. शेख हसीना यांनी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या निवडणूक लढवू नये, तसेच त्यांच्या अवामी लीग या पक्षाने निवडणूक प्रक्रियेत सहभागी होऊ नये, यासाठीच बांगलादेश सरकारने या निकालाबाबत घाई केली असणार. बांगलादेशमधील न्यायालये पूर्णपणे सरकारच्या अधीन असून सरकारला अपेक्षित असलेला निकालच न्यायालयाच्या माध्यमातून दिला जातो, हे शेख हसिना यांना दिल्या गेलेल्या शिक्षा प्रकरणातून स्पष्ट झाले आहे. मुळात शेख हसीना यांच्यावर गुन्हा दाखल करणे, आरोप निश्चिती करणे, खटला चालविणे, शिक्षा सुनावणे हा सर्वच प्रकार संशयास्पद असून पूर्वनियोजित आहे. शेख हसीना यांना मानणारा एक मोठा वर्ग आजही बांगलादेशमध्ये आहे. त्यामुळे निकाल देण्यापूर्वी दोन दिवस अगोदरपासून बांगलादेशमध्ये सर्वत्र कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सगळीकडे कर्फ्यूसारखे वातावरण होते. हा एकतर्फी निकाल दिला गेल्याने त्याचे पडसाद उमटणे स्वाभाविकच होते.

हसीना यांच्या बंदी घातलेल्या अवामी लीग या पक्षाने त्यांना सुनावण्यात आलेल्या मृत्युदंडाच्या निषेधार्थ मंगळवारी देशव्यापी बंदची हाक दिली आहे. या पक्षाने या निकालाला स्वीकारण्यास पूर्णपणे नकार दिला आहे. अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस आणि मंत्र्यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी शेख यांच्या समर्थकांकडून करण्यात येत आहे. पक्षाच्या फेसबुक पेजवर एक व्हिडीओ प्रसिद्ध करून हा निर्णय पक्षपाती आणि राजकीय सूडबुद्धीने घेतल्याचे म्हटले आहे. १४ ऑगस्ट रोजी खटला सुरू झाला आणि १७ नोव्हेंबर रोजी निकाल देण्यात आला. न्यायालयाने दोन महिन्यांच्या कालावधीत फक्त २० दिवस या खटल्याची सुनावणी केली. खटल्यात ८४ साक्षीदारांपैकी फक्त ५४ साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. सरन्यायाधीश महिनाभर अनुपस्थित होते, तरीही निकाल देण्यात आला.


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-७९८ दि.-.-.-

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री गफार अकबर शेख, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **वडील**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अकबर बुढण शेख | वडील | ०१.०४.१९६१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८०० दि.-.-.-

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री गफार अकबर शेख, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गफार अकबर शेख | स्वतः | ०३.०७.१९८७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अंबड यांचे न्यायालय**
**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२२९/२०२५ पु.ता.१६/१२/२०२५.**

**जाहीर प्रगटन**

**अर्जदार**
**१. सरस्वती शेषराव मुळे, वय ६० वर्ष**
**२. राजेश शेषराव मुळे, वय ४० वर्ष**
**३. रवि शेषराव मुळे, वय ३५ वर्ष**
**सर्व रा. चांगले नगर, अंबड ता. अंबड जि.जालना**
**गैरअर्जदार - निरंक**
**विरुध्द**
**कलम- २ व ७ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

श्री. एस. ए. काळबांडे विधिज्ञ यांच्यामार्फत अर्जदारानी या न्यायालयात अर्ज केला आहे की, शेषराव लिंबाजी मुळे हे दिनांक १९/०२/२००० रोजी मयत झाले आहे. मयत शेषराव लिंबाजी मुळे यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदाराने शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

करीता या जाहीर प्रगटनाद्वारे सर्वत्र कळविण्यात येते की, याबाबत जर कोणास काही एक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसाच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१९/११/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित**
**क.लिपीक**

**आदेशान्वये**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**व.स्तर,अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-७९९ दि.-.-.-

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री गफार अकबर शेख, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **बहीण**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख सलिमाबी अकबर | बहीण | ०५.०७.१९८४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९४१/२०२५**
भिमराव रामराव तळेकर विरूध्द निरंक
**(मार्फत-ॲड.ए.बी.बांगर)**

ज्याअर्थी मयत नामे **रामराव अण्णा तळेकर हे दि.२९.०१.१९८७ रोजी मादळमोही ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. भिमराव रामराव तळेकर, वय-५९ वर्षे, धंदा-शेती, रा.मादळमोही ता.गेवराई जि.बीड, २.अर्जुन रामराव तळेककर, वय-६३ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे रामराव अण्णा तळेकर यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२०/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९३२/२०२५**
कमल रामभाऊ औंढकर विरूध्द निरंक
**(मार्फत-ॲड.ए.बी.बांगर)**

ज्याअर्थी मयत नामे **रामभाऊ पि.विठोबा औंढकर हे दि.०७.०५.२०२५ रोजी वाळुज हॉस्पिटल, तिसगांव जि.छत्रपती संभाजीनगर** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.कमल भ्र.रामभाऊ औंढकर, वय-७२ वर्षे, धंदा-घरकाम, रा.राजापुर ता.गेवराई जि.बीड, २.अंकुश पि.रामभाऊ औंढकर, वय-५१ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर, ३. लहु पि.रामभाऊ औंढकर, वय-४८ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर, ४.पांडुरंग पि.रामभाऊ औंढकर, वय-४२ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे रामभाऊ पि.विठोबा औंढकर यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२२/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९४६/२०२५**
साबीरा अनिस शेख वि.निरंक
**(मार्फत-ॲड.पी.बी.घारगे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **अनिस पि.हसन शेख हे दि.२६.०५.२०२० रोजी शिवाजी चौक, संजय नगर, मुंब्रा, ठाणे** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.साबीरा भ्र.अनिस शेख, वय-६० वर्षे, धंदा-मजुरी, रा.महांडुळा, ता.गेवराई जि.बीड, २.सबदर पि.अनिस शेख वय-४४ वर्षे, धंदा-मजुरी, रा.सदर, ३.अकबर पि.अनिस शेख, वय-४१ वर्षे, धंदा-मजुरी, रा.सदर, ४.अन्वय पि.अनिस शेख, वय-३३ वर्षे, धंदा-मजुरी रा.सदर, ५.हजराबी भ्र.हसन शेख, वय-८५ वर्षे, धंदा-मजुरी, सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे रामभाऊ पि.विठोबा औंढकर यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१९/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२०/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



## पान १ वरुन...


**प्राथमिक शिक्षणाधिकारी....**

फुलारी यांना शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९४९ मधील नियम १६ च्या तरतुदी लक्षात घेता, निलंबित असताना श्री. फुलारी यांनी खाजगी नोकरी स्वीकारणे किवा व्यवसाय करणे त्यांना अनुज्ञेय असणार नाही, निलंबित असताना त्यांनी खाजगी नोकरी स्वीकारल्यास किंवा व्यवसाय केल्यास सदर गैरवर्तणूकीबाबत ते दोषी ठरतील आणि तद्नुसार कारवाईस पात्र ठरतील. तसेच अशा बाबतीत निर्वाह भत्यावर त्यांचा हक्क राहणार नाही.महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने, श्री रनजितसिंह देओल,प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन यांनी सदरील निलंबनाची कारवाई केली आहे.

**स्वस्तात विमानाची ....**

अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या देखरेखीखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, गहिनाथ बावनकर, राम पवार यांचा विशेष सहभाग होता.

सर्वसामान्य नागरिकांनी अमिषाला बळी पडू नये

स्वस्तात विमानाची तिकीट मिळेल, परदेशात नोकरी लावून देतो, मोठा माल स्वस्तात देतो अशा कोणत्याही आमिषावर विश्वास ठेवू नये.मोठी रक्कम देताना खात्री करूनच व्यवहार करावा.फसवणूक संशयित वाटल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा.

**बारा लाखाचा ....**

- ४,००,०००/- व एक ब्रास वाळू असा एकूण - ४,०६,०००/- चा मुद्देमाल जप्त करुन त्याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन दिंद्रुड येथे गु.र.नं.: २९४/२०२५ कलम: ३०३(२) इछड प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर दुसर्या घटनेत दिनांक १८/११/२०२५ रोजी २२.१५ वा. लोनगाव चौकाजवळ, आनंदगाव ते लोनगाव रोड वर आरोपी जीवन काशिनाथ साळवे, वय ३० वर्षे, रा. खरात आडगाव, ता. माजलगाव हा त्याच्या ताब्यातील वाहन क्रमांक ४०७ टेम्पो क्र. चक २१ द ०३५३ मध्ये अवैधरीत्या दीड ब्रास वाळू किंमत - ९,०००/- वाहतूक करतांना मिळून आल्याने त्याच्या ताब्यातील टेम्पो वाहन किंमत - ८,००,०००/- व दिड ब्रास वाळू असा एकूण - ८,०९,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन दिंद्रुड येथे गु.र.नं.: २९५/२०२५ कलम: ३०३(२) इछड प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश गायकवाड, यांच्या मार्गदर्शनात सपोनि. महादेव ढाकणे, पोउपनि. पवनसिंग जंघाळे,पोह/१७६ भराडे,पोशि/३६० सचिन गायकवाड यांनी केली आहे.

# ३२ जिल्हा परिषदा, ३३१ पंचायत समित्यांचा बिगुल ५ डिसेंबरपासून

## मुंबईसह २९ महापालिकांची निवडणूक ३१ जानेवारीपूर्वी




राज्यातील ३२ जिल्हा परिषदा, ३३१ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा बिगुल पाच डिसेंबरपासून वाजणार आहे. राज्यातील ११२ तहसीलदारांना उपजिल्हाधिकारीपदी पदोन्नती देण्यात आली आहे. आता ते सगळेजण आठ-दहा दिवसांत बदलीच्या ठिकाणी हजर होतील. त्या सर्वांचा हजर झाल्याचा दैनंदिन अहवाल विभागीय आयुक्तांकडून मागविला आहे. त्यानुसार नोव्हेंबरअखेर दुसरा टप्पा जाहीर होईल, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगातील विश्वसनीय सूत्रांनी दिली. सध्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यामुळे उपजिल्हाधिकारी संवर्गातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची रिक्त पदे पदोन्नतीने भरणे आवश्यक आहे, असे राज्य निवडणूक आयोगाने सरकारला कळविले होते. त्यानुसार ७ नोव्हेंबर रोजी महसूल व वन विभागाने ११२ तहसीलदारांची पदोन्नतीचे आदेश काढले. त्यातील काहींनी पसंतीपत्रे दिली असून अद्याप अनेक उपजिल्हाधिकारी बदलीच्या ठिकाणी रूजू झालेले नाहीत. त्यामुळे निवडणूक आयोगाला जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा दुसरा टप्पा जाहीर करता आलेला नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाने आता सर्व विभागीय आयुक्तांना पत्रव्यवहार केला आहे. त्यानुसार पदोन्नती झालेले उपजिल्हाधिकारी किती हजर झाले आहेत याचा अहवाल प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांकडून मागवावा, त्याचा दैनंदिन अहवाल आयोगाला द्यावा, असेही त्या पत्रात नमूद आहे.

नोव्हेंबरअखेर दुसरा टप्पा जाहीर करून पाच डिसेंबरपासून अर्ज स्वीकृतीचे नियोजन आहे. त्यानंतर सात दिवस अर्ज स्विकृतीसाठी, सात दिवस अर्ज माघार, छाननी, अंतिम उमेदवार यादीसाठी असतील. प्रचारासाठी सहा दिवसांचा अवधी असेल आणि मतदान व मतमोजणी व विजयी उमेदवांराना प्रमाणपत्र वाटप, हे सगळे ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचेही सूत्रांनी सांगितले.



# परळी नगर परिषद निवडणूक उमेदवारी अर्ज छाननी दरम्यान

## निवडणूक निर्णय अधिकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श.प.)नगराध्यक्ष पदाचे उमेदवारांचे पती दिपक देशमुख यांच्यात खडाजंगी

परळी ( प्रतिनिधी)

परळी नगरपरिषद निवडणूक अर्ज छाननी दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार त्यांचे पती माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यामध्ये खडाजंगी झाली. यावेळी, दीपक देशमुख संतप्त होऊन त्यांनी आपण कोणाच्या दबावाखाली काम करत आहे ते सांगावे असे उद्विग्न सवाल त्यांनी केला. जर निवडणूक निर्णय अधिकारी कुणाचा दबावाखाली काम करत असतील तर आम्ही इथे येण्याचे गरजच काय असेही ते म्हणाले. निवडणूक अर्ज छाननी दरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सौ. संध्या देशमुख यांचे पती दीपक देशमुख यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची उमेदवारी अर्ज छाननी वर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

# बीड सायबर पोलीसांची विशेष कामगीरी-दोन आरोपी अटक

सायबर पोलीस ठाणे बीड येथे ऑनलाईन फसवणुक गु.र.न. ८६/२०२४ कलम ४२०,३४ भा.द.वी सह कलम ६६,६६ (क) आय.टी. ॲक्ट २००० अन्वये दाखल गुन्ह्यातील दोन आरोपींना सायबर पोलीस स्टेशन बीड येथिल पथकाने विमाननगर पुणे येथुन अटक केली आहे. यामध्ये आरोपी नामे अक्षय छगन येटाळे वय.३२ वर्ष रा. शहागड ता. जालना व राजेश गणेश चव्हाण वय ३० वर्ष रा. घनसावंगी जि. जालना हे दोघे शेअर बाजारात कमी वेळेत (फॉरेक्स ट्रेडींग) मध्ये जास्त परताव्याचे आमिष दाखवुन तक्रारदार बाबासाहेब कांबळे रा. गेवराई बीड यांची ५,००,०००/-रु (पाच लाख रुपये) ची आर्थीक फसवणुक करण्यात आली होती.

तक्रारदाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषगाने सायबर पोलीसांनी तांत्रीक विश्लेषण व डिजीटल पुरावे गोळा करुन आरोपींचा शोध घेण्यात आला. या तपासातुन फसवणुक करणा-या दोन आरोपींना विमाननगर पुणे येथुन अटक करण्यात आली पुढील तपास सुरु असुन गुन्ह्यात इतर कोणी सहभागी आहे काय तसेव अजुन किती लोकांची फसवणुक करण्यात आली आहे याची सखोल चौकशी करण्यात येत आहे.

हि कारवाई मा.पोलीस अधीक्षक बीड, अपर पोलीस अधीक्षक बीड, उपविभागीय पोलीस आधिकारी बीड यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणे बीड चे पोनि निलेश केळे, सपोनि संदिप अराक, सफौ भारत जायभाये, पोह विजय घोडके, पो.अं.निलेश उगलमुगले, पो.अं. श्रीक्रष्ण टेकाळे तसेच तांत्रिक विश्लेष कक्ष येथील अश्विनकुमार सुरवसे यांच्या पथकाने केली. बीड जिल्हा पोलीसांचे नागरीकांना आवाहन आहे की, शेअर मार्केटमध्ये जास्त परतावा, खात्रीशीर नफा अशा प्रकारच्या आमीषावर विश्वास ठेवु नये.



धाराशिव -राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अल्पसंख्यांक विभाग प्रदेश अध्यक्ष अफजल फारूक, जिल्हा अध्यक्ष डॉ.प्रताप भैय्या पाटील , प्रदेश सरचिटणीस मसूद भाई शेख, जिल्हा उपाध्यक्ष कादरभाई खान, माजी नगराध्यक्ष खलीफा खूरेशी यांच्या हस्ते तौफिक शेख यांची अल्पसंख्यांक जिल्हा अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली. यावेळी अल्पसंख्यांक शहराध्यक्ष इस्माईल काझी, तुळजापूर शहर उपाध्यक्ष मकसूद शेख, तालुकाध्यक्ष मुशर्रफ शेख, विधानसभा अध्यक्ष सईद काझी, सत्तार भाई अल्पसंख्याक विधानसभा अध्यक्ष इब्राहिम इनामदार तुळजापूर शहराध्यक्ष वाहेदभाई शेख रफिक भाई शेख व असंख्य कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# गेवराईच्या विकासासाठी आ. विजयसिंह पंडित यांची खंबीर साथ - महेश दाभाडे

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई शहाराच्या सर्वांगिन विकासासाठी भविष्यवादी नेतृत्वाची गरज आहे आणि ती क्षमता शिवछत्र परिवारात आहे. विकास कामासाठी सरकारकडून निधी मंजुर करून आणावा लागतो तशी जाण असावी लागते. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी आपल्या आमदारकीच्या केवळ दहा महिन्यांत ३५ कोटी रुपयांचा निधी गेवराई शहरासाठी मंजुर करून आणला आणि जवळपास दहा कोटी रुपयांची विकास कामे सुरु देखील झाली आहेत, काही परिपूर्ण झालेली आहेत. यापुढील काळात गेवराई नगर परिषदेच्या माध्यमातून शहराचा चेहरा-मोहरा बदलायचा आहे, त्यासाठी नगर पालिकेची सत्ता आपल्या हातात असणे आवश्यक आहे आणि ती सत्ता मिळवण्यासाठी आपण मला आशिर्वाद द्या. घड्याळ या चिन्हासमोर मतदान करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताने विजयी करा असे आवाहन माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांनी केले. मतदारांशी सुसंवाद साधताना ते बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.शितलताई दाभाडे यांच्यासह सर्व प्रभागातील राष्ट्रवादीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ महेश दाभाडे यांनी शहरातील विविध भागांचा दौरा करून मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, शिवछत्र परिवाराने कधीही विकास कामांत दुजाभाव केला नाही. सत्ता असो की नसो कायम लोकसेवेच्या भुमिकेमध्ये माजी आमदार अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित काम करत आहेत. आमदार झाल्यानंतर विजयसिंह पंडित यांनी दहा महिन्यांच्या कालावधीमध्ये कोट्यावधी रुपयांचा निधी गेवराई तालुक्यासाठी खेचून आणला. सिमेंट रस्ते, नाल्या, कब्रस्थान संरक्षण भिंत, स्मशानभुमी बांधकाम, सभागृहाचे बांधकाम असे विविध कामे पूर्ण देखील झाले आहेत. यापुढील काळात गेवराई शहरातील उर्वरित विकास कामांनाही सुरुवात केली जाईल. येणाऱ्या काळात गेवराई शहर स्मार्ट शहर म्हणून ओळखले जाईल. गेवराई शहराच्या उज्वल भविष्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घड्याळ या चिन्हावर मतदान करून नगराध्यक्ष व सर्व नगरसेवक मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

महेश दाभाडे यांनी गेवराई शहरातील विविध प्रभागांचा दौरा करून मतदारांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्यासमवेत उमेदवार कृष्णा मुळे, महेश मोटे, अशोक गायकवाड, जीवन दाभाडे, शिवनाथ परळकर, सचिन मोटे, राहुल मोटे, महादेव काशिद, बाळू दाभाडे, अनिल जवंजाळ, शुभम घुंबार्डे, विशाल दाभाडे, मंजुरभाई बागवान, अमोल पौळ, अमोल होंडे, माऊली पंडित यांच्यासह राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# भगवान विद्यालया समोरच चालणाऱ्या वैश्या व्यवसायावर छापा

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या कारवाईत गुन्हा दाखल तर पिडीत महिलेची सुटका

बीड /प्रतिनिधी

अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना दिनांक १९/११/२०२५ रोजी दुपारी गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की , पोलीस ठाणे शिवाजी नगर हद्दीत भगवान विद्यालय समोर, धानोरा रोड, येथे राहत्या घरामध्ये बाहेरील महिलांना बोलावून, वेश्या व्यवसाय करीत आहेत. ही माहिती वरिष्ठांना देण्यात आली. त्यावरून वरिष्ठांनी पोलीस निरीक्षक उमाशंकर कस्तुरे यांना -क्ष्हण सोबत सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून झख उमाशंकर कस्तुरे व अ. मा. वा. प्र. कक्षाच्या प्रमुख झडख पल्लवी जाधव या त्यांच्या संपूर्ण स्टाफसह तसेच डमी ग्राहक व पंचासह सापळापूर्व पंचनामा करून सदर ठिकाणी गेले. डमी ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता तेथे असलेल्या महिला एजंटने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी



१००० रुपयांची मागणी केली. डमी ग्राहकाने ठरल्या प्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास ठरलेला इशारा केला असता, पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा मारला. पैसे स्वीकारलेल्या महिलेला तिचे नाव गाव विचारले असता, तिने तिचे नाव सीताबाई नारायण दहे (वय ७० वर्षे रा. भगवान विद्यालया समोर, धानोरा रोड ता.जि बीड) असे सांगितले. सदर महिलेची पंचासमक्ष झडती घेतली असता, डमी ग्राहकाने दिलेल्या नमूद वर्णनाच्या ५०० रू. दराच्या २ नोटा मिळून आल्याने त्या पंचासमक्ष जप्त केल्या. सदर ठिकाणी एक पीडित महिला मिळून आली. पीडीत महिलेला विश्वासात घेवून चौकशी केली असता , तीने सांगितले की, सीताबाई नारायण दहे या, पीडीत महिलांना बोलवून घेतात व स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ग्राहकाकडून पैसे घेवून, पीडीत महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. तसेच रुमची झडती घेतली असता २४ विना वापरलेले निरोध मिळून आले आहे. नमुद आरोपी महिलेवर, पीडीत महिलेस स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बोलावून घेऊन, स्वतःच्या ताब्यातील जागेचा वापर करुन त्याच कमाईवर उदरनिर्वाह करुन वेश्याव्यवसाय करण्यास लावले व सदर महिलांचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून त्यांच्या विरुद्ध शिवाजी नगर पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ३,४,५,६ ,७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच पीडित महिलेची सुटका करण्यात आली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत , अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उमाशंकरकस्तुरे प्रभारी पोलीस उपअधीक्षक मुख्यालय , पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव , महीला पोलीस हवालदार उषा चौरे, हेमा वाघमारे , पोलीस हवालदार प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई योगेश निर्धार सर्व नेमणूक अ. मा. वा. प्र. कक्ष यांनी केली.

# रेणकु बेल्हेकर यांना आ.धस यांनी लोणी गणातून उमेदवारी द्यावी

आष्टी (प्रतिनिधी)

येत्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांचे पडघम वाजायला लागले असतानाच कार्यकर्ते जोरदार तयारी करताना दिसत आहेत. आष्टी तालुक्यातील लोणी गण हा नेहमीच आ. सुरेश धस व माजी आ. साहेबराव दरेकर यांना मानणारा गण राहिला आहे.

गेली अनेक वर्षापासून या गणांमधून कधी माजी आ. साहेबराव दरेकर यांचे उमेदवार निवडून आलेले आहेत तर कधी आ. सुरेश धस यांना मानणारे सदस्य सुद्धा या गणामधून निवडून आलेले आहेत. प्रत्येक निवडणुकीमध्ये जवळपास साडेतीन हजार मतांपेक्षा जास्त मतदान असलेले लोणी गाव हे निर्णायक मतदान देत असते. यावेळी हा गण ओबीसी आरक्षणात राखीव झालेला आहे. त्यामुळे ओबीसी मधील कार्यकर्त्यांची जोरदार तयारी सुरू झाली आहे. यामध्येच अतिशय प्रामाणिक शांत आणि संयमी स्वभावाचे पैलू लाभलेले लोणी गावचे माजी सरपंच रेनकू बेल्हेकर हे कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव निवडणुकीची तयारी करताना दिसत आहेत. मागील जवळपास २५



वर्षांपासून रेनकु बेल्हेकर हे आ. सुरेश धस यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून तालुक्यामध्ये परिचित आहेत. मागील पाच वर्षांपूर्वी त्यांनी लोकमतातून लोणी ग्रामपंचायत निवडणुक जिंकून संपूर्ण पॅनल बहुमताने निवडून आणला होता.

आ. सुरेश धस यांची पाच वर्ष त्यांना साथ मिळाल्यामुळे लोणी गावचा सर्वांगीण विकास करण्यास ते सक्षम ठरले आहेत. अतिशय शांत स्वभाव आणि लोकांच्या अडीअडचणींमध्ये, सुख दुखामध्ये सदैव मदत करताना ते दिसून येतात. कुणी कितीही आंगावर आला तरी ते कधीच संयम सोडत नाहीत. त्यामुळे त्यांचे एक सक्षम आणि जनमानसात कार्यक्षम व्यक्तिमत्व म्हणून लोणी गनामध्ये स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे लोणी गणातील सर्व वाडी वस्ती आणि गावामधील सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांबरोबर त्यांचे स्नेहपूर्ण सबंध आहेत. त्यामूळे त्यांच्या उमेदवारीला कोणाचाही विरोध दिसत नाही. माजी आ. साहेबराव दरेकर नाना आणि आ. सुरेश धस हे आज तरी ही एकत्र निवडणूक लढविणार आहेत यात शंका नाही. माजी आ. साहेबराव दरेकर यांच्याशी रेनकू बेल्हेकर यांचे अतिशय जवळचे आणि जिव्हाळ्याचे संबंध आहेत त्यामुळे नानांचा रेणकु अण्णा बेल्हेकर यांच्या उमेदवारीला हिरवा कंदील मिळेल असे आज तरी दिसत आहे. रेणकू बेल्हेकर हे माळी समाजातील एक सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातील नेतृत्व असून त्यांना मानणारा मित्रपरिवार हा सर्व जाती धर्मातील आहे. लोणी गावचे सरपंच पद भूषवताना त्यांनी गावातील सर्वच जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतलेले आहेत त्यामुळे लोणी गावामध्ये सर्वाधिक फळबागा, शेततळे, सौर ऊर्जा प्रकल्प, बंधारे आणि शेतकऱ्यांच्या वैयक्तिक लाभाच्या योजना, प्रचंड संख्येमध्ये शासकीय अनुदानातून विहिरी मंजूर करून जास्तीत जास्त गरजूंना घरकुल योजना राबविण्यासाठी सदैव प्रयत्न केले आहेत.

त्यांच्या रूपाने नक्कीच आष्टी पंचायत समितीमध्ये एक चांगले व्यक्तिमत्त्व पंचायत समिती सदस्य म्हणून भारतीय जनता पार्टीला मिळेल आणि लोणी गणातील शेतकरी, महिला भगिनी त्याचप्रमाणे सर्व सामान्य नागरिकांचे मूलभूत प्रश्न सुटण्यासाठी चांगल्या प्रकारची मदत होईल असे लोकांमधून बोलले जाते. त्यांच्या उमेदवारीसाठी लोणी परिसरातील सर्वच कार्यकर्ते आमदार सुरेश धस व साहेबराव दरेकर यांना प्रत्यक्ष भेटून उमेदवारीसाठी आग्रह करणार आहेत अशी माहिती लोणी गणातील अनेक कार्यकर्ते करणार आहेत अशी माहिती युवा नेते राजेंद्र चोभे यांनी दिली आहे.

# धारुर येथे शासकीय कापूस खरेदीला प्रारंभ पण शेतकऱ्यांना करावा लागतो मोठ्या अडचणीचा सामना

## कापूस विक्रीसाठी सीसीआय खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी आणावा - सचिव दत्ता सोळंके

वडवणी । प्रतिनिधी

भारतीय कापूस निगम लिमिटेड (सीसीआय) च्या वतीने शासकीय हमीभावाप्रमाणे विश्वतेज कापूस खरेदी केंद्र धारूर या ठिकाणी कापूस खरेदीला प्रारंभ झाला आहे.भारतीय कापूस महामंडळ (सीसीआय) यांनी यावर्षी पहिल्यांदाच कापूस खरेदीसाठी पूर्णपणे ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे या प्रक्रियामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

कपास किसान पवर नोंदणी करताना १ हेक्टरला १३ क्विंटल ५० किलो कापूस खरेदीची मर्यादा दिली आहे त्यामुळे उरलेला कापूस विक्रीसाठी अडचण येते,१२ टक्के आर्द्रता पर्यंतचा कापूस खरेदी केला जाणार आहे तसेच पवर नोंदणी करताना आधार कार्ड,ऑनलाईन ७/१२- ८



व फोटो इत्यादी कागदपत्रे अपलोड करून अचूक माहिती भरावी लागते तसेच आधार कार्डशी मोबाइल नंबर लिंक असावा,आधार कार्डसी बँक खाते लिंक करावे एनपीसीआय केल्याची खात्री करावी कापसाची रक्कम आधार लिंक खात्यावर जमा होते,मोबाईलवर ओटीपी येतो नेटवर्क नसल्यास अडचणी निर्माण होते या ऑनलाइन प्रक्रियामुळे मोठ्या अडचणींचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे.

धारूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव दत्ता सोळंके,आबासाहेब काकडे,श्रीनिवास दरेकर,सीसीआयचे केंद्रप्रमुख ग्रेडर श्री.चव्हाण सर,सीसीआयचे विवेक सर,वाल्मिक रुद्रे यांनी शेतकऱ्यांना ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया पूर्ण केल्यास कापूस विक्रीसाठी आणावा ज्यामुळे त्यांना अडचणीचा सामना करावा लागणार नाही असे आवाहन केले आहे.

सीसीआय फक्त राज्य सरकारने पडताळणी केलेल्या शेतकऱ्याकडूनच कापूस खरेदी करेल म्हणून सीसीआय कापूस केंद्रावर विकण्यापूर्वी सर्व शेतकऱ्यांनी स्वतः नोंदणी करावी आणि सक्षम अधिकाऱ्यांनी पडताळणी केल्यानंतर ऑनलाईन स्लॉट बुक करावा,आधार व्हेरिफिकेशन ही नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच शेतकऱ्यांनी आपला कापूस विक्रीसाठी सीसीआय कापूस खरेदी केंद्रावर आणावा तसेच शासनाने हेक्टरी मर्यादा वाढवावी व ऑनलाइन प्रक्रिया बंद करावी या शेतकऱ्यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करावा असे आवाहन बाजार समितीचे सचिव दत्ता सोळंके, आबासाहेब काकडे यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती धारुर यांच्या वतीने केले आहे.

# सिंदफणा नदीपात्रात अवैध ट्रॅक्टर वाळू घेऊन जाताना शिरूर पोलिसांनी रंगेहाथ पकडला

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १९/११/२०२५ रोजी १०.३० वाजता शिरुर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार १५३० तुषार गायकवाड पोलीस अंमलदार २२ ७९ सुनील बहिरवाल हे बीट मध्ये पेट्रोलिंग करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, माळेवाडी शिवारातील सिंदफणा नदीपात्रात एक ट्रॅक्टर वाळू घेऊन जात आहे.त्यानुसार घटनास्थळावर जाऊन छापा मारला असता

तेथे एक हिरव्या रंगाचे जॉन डीअर ट्रॅक्टर त्याला ट्रॉली जोडलेली व त्यात वाळू भरलेली मिळून आली .चौकशीत सदर ट्रॅक्टर चालकाचे नाव हनुमंत रामभाऊ काशीद रा. फुलसांगवी, तालुका शिरूर असे असून, वाळू अनधिकृतपणे वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आले.

या संदर्भात पोलीस स्टेशन शिरुर कासार येथे गु.र.नं. ३२०/२०२५ कलम ३०३(२), बी.एन.एस. अन्वये ट्रॅक्टर चालक हनुमंत रामभाऊ काशीद



रा. फुलसांगवी, तालुका शिरूर यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर आरोपीकडून खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ट्रॅक्टर किंमत ८,००,०००/-वाळू किंमत ८,०००/-एकूण मुद्देमाल किंमत ८,०८,०००/-ही कारवाई वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर कासार पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, पोह/१५३० गायकवाड, पोशी २२७९ सुनील बहिरवाळ यांनी केली.सदर कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांना प्रतिबंध लागून अशा प्रकारच्या बेकायदेशीर वाहतुकीवर आळा बसण्यास मदत झाली आहे.



# पालक व ज्येष्ठ नागरीकांचे पालन पोषण व कल्याण कायद्याविषयी मार्गदर्शन

लातूर ।प्रतिनिधी

केंद्र सरकारचा समाज कल्याण व सक्षमीकरण विभाग व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या सूचनेनुसार पालक व ज्येष्ठ नागरीकांचे पालन पोषण व कल्याण कायदा २००७ या विषयी जनजागृती करण्यासाठी लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि लातूर उपविभागीय कार्यालयाच्यावतीने मातोश्री वृद्धाश्रम येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांचे मार्गदर्शनाखाली झालेल्या जनजागृती शिबिरामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, मातोश्री वृद्धाश्रमाचे अध्यक्ष डॉ. महेश देवधर तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे संघटक डॉ. बी. आर. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

नायब तहसीलदार परमेश्वर कांबळे, मंडळ अधिकारी आर. के. झाडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर चे कर्मचारी व मातोश्री वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ नागरिक यावेळी उपस्थित होते.

# महाविद्यालयाच्या विकासात श्री.आबेद चाऊस यांचे योगदान महत्तवपूर्ण:- प्रा.मोहन परजने

## जयभवानीत श्री.आबेद चाऊस यांचा सेवा गौरव

पाटोदा (प्रतिनिधी)

जय भवानी महाविद्यालयाच्या प्रशासकीय विकासात कार्यालयीन अधिक्षक श्री.आबेद चाऊस यांचे योगदान महत्तवपूर्ण आहे.असे प्रतिपादन पर्यावारणवादी विचारवंत प्रा.मोहन परजने यांनी केले. ते पाटोदा येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान महाविद्यालयात कार्यालयीन अधिक्षक श्री.आबेद चाऊस यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित सेवा गौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की पाटोदा सारख्या दुर्गम भागात श्री.चाऊस यांनी प्रमाणिक कामातुन आपली ओळख निर्माण केली.एक उपक्रमशील प्रशासक म्हणुन काम केले.आदरणिय शिवाजीराव दादा व श्री.अमरसिंह पंडित यांनी टाकलेला विश्वास त्यांनी आपल्या कामातुक सार्थ करून दाखवला.त्यांच्या भावि आयुष्यासाठी शुभेच्छा! व्यक्त केल्या.या प्रसंगी व्यासपीठावर विकास समितीचे सदस्य,श्री.दिलीपराव जाधव,मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर,संस्थेचे मुख्यलेखापाल श्री.प्रताप हातोटे,सहलेखापाल प्रा.काशीनाथ गोगुले हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे होते.सत्कार मुर्ती श्री.आबेद चाऊस सप्त्नीक संपूर्ण कुटुंबासह उपस्थित होते.तसेच समन्वयक प्रा.डॉ.सुनिल जाधव,कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे,माजी प्राचार्य



डॉ.शौकत सय्यद,प्रा. डॉ.भास्कर आहिरे,प्राचार्य पठाण,श्री.शहाजी जाधव आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.या गौरव समारंभाचे प्रस्ताविक विद्यापीठाच्या अधिसभा सदस्या श्रीमती डॉ.कल्पना घारगे यांनी केले.अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते श्री.आबेद चाऊस यांचा संपूर्ण कपडे,सन्मानचिन्ह,शाल श्रीफळ देवून सप्त्नीक सत्कार करण्यात आला.या प्रसंगी त्यांची सून श्रीमती जरीन चाऊस व नात कु.इंशरा यांनी मनोगत व्यक्त केले.सत्काराला उत्तर देताना श्री.आबेद चाऊस यांनी माजी मंत्री आदरणीय शिवाजीराव दादाज्ञव श्री.अमरसिंह (भैय्यासाहेब )पंडित यांचे आभार व्यक्त करून.माझ्या सारख्या एका शेतकरी कुटुंबातील तरुणाला कार्यालयीन अधिक्षक सारख्या महत्वाच्या पदावर काम करण्याची संधी दिली.तेव्हा आजन्म त्यांच्या ऋणात राहीन अशी ग्वाही दिली.या प्रसंगी प्रा.डॉ.शौकत सय्यद,प्रा.डॉ.भास्कर आहिरे,प्रा.कल्याण पवार,संस्थेचे लेखापाल श्री.प्रताप हातोटे,सहलेखापाल प्रा.काशीनाथ गोगुले यांनी आपल्या भावना व्यक्त करून त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा ! दिल्या मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी श्री.आबेद चाऊस यांच्या प्रशासकीय कार्याबद्दल कौतुक करून त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा एवढा मोठा सेवा गौरव समारंभ होतोय हीच त्यांच्या कार्याची पावती आहे.या शब्दात त्यांच्या कार्याचा गौरव केला.शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.सदाशीव सरकटे यांनी सर्वांच्या भावनांची योग्य सांगड घालून श्री.आबेद चाऊस यांच्या प्रशासकीय कामाचे अनुभव सांगितले.त्यांच्या स्वछंदी हसतमुख स्वभावामुळे त्यांनी आनेक प्राचार्याबरोबर चांगले काम केले.असे सांगून त्यांच्या सेवेचा खरा गौरव झाला असल्याचे सांगून.भावी आयुष्यासाठी शुभेच्छा..!दिल्या.या सेवा गौरव समारंभाचे बहारदार संचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले.तर आभार ग्रंथपाल श्रीमती प्रा.ज्योती रकटे ( कठारे ) यांनी मानले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.चाऊस यांची मुले,सुना,मुलगी व नातु ,आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.हा सेवा गौरव समारंभ यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गौरव सोहळा समितीतील सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# प्रा. डॉ. लक्ष्मण उलगडे परिवाराच्या वतीने श्रीगुरुमाऊली व पदाधिकाऱ्यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील सिद्धेश्वर मंगल कार्यालयात १६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रा. डॉ. लक्ष्मण उलगडे परिवाराच्या वतीने आयोजित कार्यक्रमात तमलूर मठाचे मठाधिपती आदरणीय ष.ब्र. १०८ श्री शिवानंद शिवाचार्य महास्वामी तमलुरेश्वर यांचा भव्य सत्कार करण्यात आला.



यावेळी डॉ. लक्ष्मण उलगडे यांचा आशिर्वादरूपी सत्कार स्वामीजींच्या हस्ते संपन्न झाला. तसेच गेल्या २४ वर्षांपासून सुरू असलेल्या तमलूर-मदनूर ते श्रीक्षेत्र कपिलाधार महापदयात्रेत कार्यरत पंचवीस पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. नव्या तीन पायाचा घोडा चित्रपटातील कलाकार अक्षय मांडे यांचाही डॉ. उलगडे यांच्या हस्ते सत्कार झाला.

कार्यक्रमात उलगडे लिखित लोकप्रशासन संकल्पना व तत्वे कोश या ग्रंथाचे प्रकाशन श्रीगुरुमाऊली यांच्या हस्ते करण्यात आले. आशिर्वचनात त्यांनी सांगितले की, सेवा ही भावना मनातून परिश्रमपूर्वक असावी. पदयात्रेत भोजन, सुरक्षा, आरोग्य व निवासासाठी कार्यरत पदाधिकाऱ्यांचा सन्मान आवश्यक. उलगडे परिवाराने त्या भावनेने प्रीतीभोजाची उत्तम व्यवस्था केली, ही स्तुत्य बाब आहे. डॉ. उलगडे यांच्या कार्याचे कौतुक करताना त्यांनी म्हटले, मूर्ती लहान पण कीर्ती महान अथक परिश्रमातून त्यांनी मिळविलेले यश प्रेरणादायी आहे.प्रास्ताविक पदयात्रा सचिव संतोष मांडे यांनी केले, तर मनोगत डॉ. उलगडे यांनी व्यक्त केले. आभार महापदयात्रेचे उपाध्यक्ष जीवन पाटील यांनी मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अध्यक्ष लक्ष्मण पाटील बिरादार, प्रभय्या स्वामी, कांतू महाराज, तेजेराव टेकमाळे, शिवा बन्नालिकर, आकाश गुडपळे, बापू डाकनवाले तसेच उलगडे परिवार यांनी परिश्रम घेतले.

# वडवणी शहरात बाजाराच्या दिवशी वाहतूक कोंडी

## बाजार मेंन रस्त्यावर भरत असल्याने गर्दी

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी शहर हे वडवणी तालुक्यातील बाजार पेठेचे बाहेर घर आहे.वडवणी बाजारासाठी एकूण पसंतीस गावातून नागरिक येतात.तसेच शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार व वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे.वडवणी येथील बुधवार रोजी बाजार हा बाजार तळावर भरत होता.ती जागा बाजार तळासाठी राखीव होती पण तेथे नगरपंचायत कार्यालय ने मनमानी कारभार करत तेथे नगरपंचायत कार्यालय ची नवीन इमारतीचे बांधकाम चालू केले आहे.त्यामुळे बाजार भरण्यासाठी जागा शिल्लक राहिली नाही.नगरपंचायत कार्यालया चे मुख्याधिकारी



यांनी बाजार भरण्यासाठी जागा उपलब्ध न करुन देऊन.तो बाजार वडवणी शहरातील चिंचवण रोडवरील मेन रोड वर भाजी पाला चा बाजार भरविला जातो.या मेन रोड वर जाड वाहतूक,बस वाहतूक, उस ट्रॅक्टर , वाहतूक करतात . दुचाकी व चारचाका वाहने रोडवर पार्क न करता रहदारीला अडथळा होणार नाही, अशा ठिकाणी पार्क करून करून प्रशासनास सहकार्य करणे आवश्यक आहे. व्यवस्थेसह नागरिकांमध्ये याप्रश्नी प्रबोधन करण्याची गरज आहे. अन्यथा शहरात वाहतूक व्यवस्थेचा कायम बोजवारा होणार आहे.रोडची गरज वाहतुकीला शिस्त लावण्यासह कोंडी फोडण्यासाठी वाहतुकीला शिस्त लावावी. नगरपंचायत कार्यालय विभागाने शहरातील वाहतूक कोंडीवर नियंत्रणासाठी पर्याय बायपास रोड बाह्यवळण रस्ता करण्याची गरज आहे. याबाबत भविष्यात कार्यवाही होणे अपेक्षित आहे. असं वडवणी शहरातील नागरिकांची मागणी करत आहेत.



# मानूर यैथे विविध विकास कामांचे भूमीपुजन

## २५ लाख रु.ची ग्रा.पं.इमारत होणार !

मानूर ।प्रतिनिधी

मानूर येथील विविध विकास कामांचा शुभारंभ मंगळवार दि.१८ नोव्हेंबर रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. जवळपास ४० लाखाहून अधिक रुपयाची कामे सुरु होत आहेत. सरपंच अशोक मामा पाखरे आणि आणि उपसरपंच महेबुब पठाण यांच्या नेतृत्वाखाली मानूर ग्रा.पं.हद्दीमध्ये विकासाचे नवे पर्व सुरु झाले आहे.

मानूर येथील ग्राम पंचायत भवन-२५ लक्ष रु.,गोपीनाथराव मुंडे चौकाचे सुशोभिकरण -५ लक्ष रु., नागनाथनगर ते नंदीनगर रस्ता,बडेवाडी येथील अंगणवाडी खोली आदि विकास कामांचा शुभारंभ उद्योगपती लिंबासेठ नागरगोजे, दै.दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, सरपंच अशोक मामा पाखरे, जेष्ठ नेते कलंदर काका पठाण यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.या प्रसंगी प्रसिध्द उद्योगपती नारायण नाना बडे, युवा उद्योजक अमोल बडे, ग्रामसेवक सिध्दार्थ खेमाडे काका, किसनराव बेळगे,दुधाजी बडे,पोपटराव सिरसाट,भारत अण्णा पाखरे,अनिल बडे,अर्जुन बनसोडे, कुमार पवार, सिताराम सुरसे,विलास बेळगे, प्रल्हाद बडे चेअरमन,उल्हास पाखरे,शौकत भाई पठाण, सुभाष सिरसाट,अलीम पठाण, महेबुबभाई बेग, दत्तू शिंदे माळी, बबन पंडागळे,पिरखा पठाण,संजय ढाकणे,म्हतारदेव बडे,प्रल्हाद बडे,संपत दुधाजी बडे,रमेशराव नाईक आदि उपस्थित होते.

# भूसंपादन लवाद प्रकरणात मागील कालावधीतील तारखा टाकून आदेश निर्गमित करुन मोठा आर्थिक अपहार झाल्याचे उघडकीस

**वकील संघाचे विद्यमान अध्यक्ष अँड पिसुरे यांच्यासह माजी अध्यक्ष अँड नन्नावरे, अँड राख आदींचा समावेश असल्याने मोठी खळबळ !**

बीड ।प्रतिनिधी

जिल्हाधिकारी बीड यांनी अपर जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय व उपजिल्हाधिकारी भूसंपादन यांच्यासह समन्वय भूसंपादन कार्यालय, जायकवाडी प्रकल्प भूसंपादन कार्यालय व उपविभागीय अधिकारी बीड या कार्यालयात भेट दिली.

भेटी दरम्यान काही संचिका तपासल्या व काही संशयितांच्या मोबाईल मधील संभाषण आणि उपलब्ध हरींरिं माहितीवरुन समन्वय भूसंपादन कार्यालयातील लवाद / अपील प्रकरणात, जुन्या तारखा टाकून, तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी नमूद करून आदेश निर्गमित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच मोबाईल तपासणीत, मोबाईल मधील काही संभाषणात मागील कालावधीतील तारखा टाकून आदेश करण्यात आल्याचे वारंवार उल्लेख करण्यात आलेला आहे आणि जुन्या तारखेच्या ४० लवाद आदेश आणखी होणार असल्याबाबत सुद्धा नोव्हेंबर महिन्याच्या संभाषणात उल्लेख आहे.

याबाबत समिति गठित करण्यात आली, समितीच्या प्राथमिक चौकशीत आढळले की तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी करून मागील कालावधीत दिनांक १ मार्च २०२५ ते दिनांक १७ एप्रिल २०२५ पर्यतच्या आदेश कालावधी नमूद करून १५४ प्रकरणात बनावट आदेश निर्गमित झालेले आहेत आणि त्या आदेशाबाबतचा पत्रव्यवहार, संबंधित लवाद आदेशाच्या कव्हरिंग लेटरवर दिनांक १७ एप्रिल २०२५ नमूद करून संबंधित जायकवाडी प्रकल्प भूसंपादन कार्यालयाला व उपविभागीय अधिकारी बीड कार्यालयाला १ ते ५ महिन्यानंतर आदेश प्राप्त झालेला आहे. या एकूण १५४ प्रकरणात जवळपास २४१ कोटी ६२ लक्ष रुपये वाढीव मोबदल्याचे बनावट आदेश तयार करण्यात आल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ छत्रपती संभाजी नगर या कार्यालयाकडून अंदाजे ७३ कोटी रुपये निधी प्राप्त करून संबंधित भूसंपादन अधिकारी मार्फत वितरण झालेले असल्याने प्रथम दर्शनी ७३ कोटी रुपयाचा अपहार झाला असल्याचे ग्राह्य धरता येईल, संबंधित आदेश पारित करताना कोणतेही रजिस्टर, कोणतीही कार्यविवरण नोंदवही बाबत माहिती भूसंपादन समन्वय कार्यालयाने ठेवलेली नाही. वर नमूद केल्याप्रमाणे एकाच दिवशी म्हणजे दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी ५० आदेश, तेही रोजनाम्यात कोणतेही पक्षकार हजर राहील्याबाबत स्वाक्षरी न होता झालेले आहेत, सदर बाब ही निश्चितच संशयास्पद आढळली आहे.

या गैरप्रकारातील प्रमुख कर्मचारी, संजय हांगे (सहायक महसूल अधिकारी, तहसील कार्यालय परळी), अविनाश चव्हाण (कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर, भूसंपादन समन्वय कार्यालय), शेख अजहर शेख बाबू (कंत्राटी ऑपरेटर भूसंपादन जायकवाडी प्रकल्प कार्यालय) व त्रिबंक पिंगळे (सेवानिवृत्त कंत्राटी कर्मचारी उपविभागीय अधिकारी कार्यालय बीड), पांडुरंग पाटील (सहायक महसूल अधिकारी, भूसंपादन समन्वय कार्यालय) राऊत (राष्ट्रीय महामार्ग कार्यालय), अ‍ॅड. एस. एम. नन्नवरे, अ‍ॅड. नरवडकर, अ‍ॅड. पिसूरे, अ‍ॅड. प्रवीण राख असल्याचे प्राथमिक चौकशीत दिसून आले आहे.

लवादचे बनावट आदेश तयार करण्याच्या या गैरप्रकारतील प्रमुख अधिकारी कर्मचारी यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात येत असून गैरप्रकार करणारे सर्व अधिकारी, कर्मचारी, वकील यांच्यावर नियमबाहय, अर्धवट सचिंका तयार करुन, त्या परिपूर्ण आहेत असे भासवुन, बनावट दस्ताऐवज तयार करुन, जुन्या दिनांका मध्ये वरीष्ठ कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या स्वाक्षऱ्या करुन, सदरचे दस्तऐवज खरे आहेत असे भासवुन, त्या बाबत अर्थिक लाभासाठी नियोजीत कट करुन, स्व:तच्या आर्थिक फायदयासाठी शासनाची फसवणुक व विश्वसघात करून महाराष्ट्र जमीन संपादन अधिनियम मधील नियामावलीचे व महाराष्ट्र भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ मधील कलमाचे उल्लघन करुन सदरचे बनावट दस्ताऐवजावरुन शासनाची फसवणुक व शासकीय निधीचा अपहार करुन खातेदारांना वितरीत केली आहे त्यामुळे संबंधितांवर कायदेशीर फिर्याद देवून फौजदारी कार्यवाही सुद्धा करण्यात आली असल्याचे महसुलचे तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# बीड नगराध्यक्ष पदासाठी ४७ पैकी ३५ अर्ज वैध तर १२ अर्ज बाद

## छाननीदरम्यान परळी, माजलगावात तणावः दीपक देशमुखांची अधिकाऱ्यांशी खडाजंगी

नगरपालिका निवडणुकीत मंगळवारी अर्जाची छाननी प्रक्रिया पार पडली. मात्रअखेरच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर अर्जआल्याने छाननी करताना यंत्रणेचीदमछाक झाली. माजलगावात राष्ट्रवादी (अ.प.) ने चाऊस यांच्या दोन अर्जावर आक्षेप घेतल्यानंतर तणाव निर्माण झाला. धारूरला एका भाजप उमेदवाराचा अर्जचबाद झाला. बीडमध्ये रात्री १० वाजेपर्यंतप्रक्रिया सुरूच होती. परळीत राष्ट्रवादी (श.प.) नेते दीपक देशमुख व अधिकारीयांच्यात मोठा वाद झाला. या वेळीहीदेशमुख यांनी पक्षपातीपणाचा आरोपकरत आपण कुणाच्या दबावाखाली कामकरत आहात ते सांगावे, असा सवालकेला. निवडणूक निर्णय अधिकारीकुणाच्या दबावाखाली काम करतअसतील तर आम्ही इथे येण्याची गरजच काय, असेही म्हणत छाननी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दरम्यान, आताछाननी प्रक्रिया पार पडल्यानंतर सगळ्यापक्षांकडून आपल्या उमेदवारासाठीगैरसोयीच्या ठरणाऱ्या अपक्षांची अर्जमाघारी घेण्यासाठी मनधरणी सुरू झालीआहे. दरम्यान, दुपारी बीड पालिकेसमोरभाजप व एमआयएम कार्यकर्तेसमोरासमोर आले. या वेळी जोरदारघोषणाबाजी झाली.

बीड नगरपालिकेत रात्री उशिरापर्यंत छाननी प्रक्रिया सुरू होती. यावेळी इच्छुकांची झालेली गर्दी दिसत आहेत. बीड शहरातील पेठ बीडभागातील वॉर्ड क्र. ३ ब मधूनभाजपचे उमेदवार अमृतसारडा हे मैदानात उतरलेलेआहेत. त्यांनी कर भरलानसल्याचे कारण पुढे करतयाच वॉर्डातील राष्ट्रवादीचेउमेदवार अमर नाईकवाडेयांनी अर्ज छाननीदरम्यान आक्षेप घेतला होता. मात्र, कर भरल्याची पावतीदाखवताच अमृत सारडायांचा अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी वैध केला.

बीडमध्ये दोन आक्षेप फेटाळले

बीड । अर्ज भरण्याच्या शेवटच्या क्षणीदुसऱ्याला एबी फॉर्म दिल्याने अनेकांनीपक्षाकडून भरलेले अर्ज अवैध झालेआहेत. सोमवारी अर्जाची छाननी दुपारीतीन वाजता पूर्ण होणार होती. मात्रनगरसेवक पदासाठी ७७४ तरनगराध्यक्षपदासाठी ४७ अर्ज आले होते. सकाळी ११ वाजता सुनावणी सुरूझाली. २६ वॉर्डाच्या सुनावणीसाठीरात्रीचे ९ वाजले. दरम्यान, नगरसेवकपदासाठी दोन उमेदवारांच्या



अर्जावरविरोधकांनी आक्षेप घेतला. त्यांचीकागदपत्रांची सुनावणी घेऊननिवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आक्षेपफेटाळत दोन्ही अर्ज वैध केले. सकाळीनगराध्यक्ष पदाच्या अर्जाची छाननीझाली. त्यामध्ये ४७ पैकी ३५ अर्ज वैधतर १२ अर्ज अवैध झाले.

अर्धे अर्ज बाद

गेवराई नगरपालिकेतनगरसेवकपदासाठी ११३जणांचे अर्ज वैध ठरले आहेत. तर २४ जणांचेअर्ज अपात्र करण्यातआले आहेत. नगराध्यक्षपदासाठी २१ अर्ज आलेहोते. त्यापैकी १० पात्र तर११ अपात्र ठरले आहेत.

### चाऊस यांच्या २ अर्जावर आक्षेपानंतर झाला तणाव

माजलगावात सहाल चाऊस गटाच्यादोन अर्जावर सोळंके गटाकडून आक्षेपघेतले गेले. यात नगराध्यक्षपदाच्याउमेदवार चाऊस महरीन शिफा बिलालयांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेतलागेला. त्यानंतरच वातावरण तणावपूर्णव्हायला सुरुवात झाली. आ. सोळंकेहेही तहसील कार्यालयात आले. त्यानंतर त्यांच्या उपस्थितीबद्दल चाऊसआक्रमक झाले. सुनावणी घेऊन हाअर्ज वैध ठरताच पुन्हा सहाल चाऊसयांच्या नगरसेवक पदाच्या अर्जावरही आक्षेप घेतला गेला. तोही वैध ठरवलागेला.

### भाजप उमेदवाराचा अर्ज बाद

धारूरमध्ये अजय गायसमुद्रे यांचा अर्जबाद झाल्याचे निवडणूक विभागाकडूनसमजले. भाजपचा नगरसेवक पदाचाअर्ज अपात्र झाल्यामुळे एकच चर्चेलाउधाण आले आहे. कागदपत्रांतीलविसंगती, आवश्यक पुराव्यांचीकमतरता आणि तांत्रिक चुका याकारणांमुळे संबंधित अर्ज अपात्रठरवण्यात आला.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# केज बसस्थानका जवळील नाल्याचा पूल कोसळण्याच्या मार्गावर; अवघ्या सहा महिन्यांतच बांधकामाचा बोजवारा!



केज/प्रतिनिधी

केज बसस्थानकातून बस बाहेर पडण्यासाठी असलेल्या मुख्य रस्त्या वरच्या नाल्यावरील पुलाची अवस्था अतिशय गंभीर बनली आहे. अवघ्या सहा महिन्यांपूर्वी नव्याने बांधलेला हा पूल आता कोसळण्याच्या मार्गावर असल्याचे स्पष्ट दिसत आहे.नागरिकांमध्ये या बाबत तीव्र नाराजी आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहिती नुसार,हा पूल नाल्यावर एचपीएम कंपनीकडून बांधण्यात आला होता. परंतु फक्त सहा महिन्यांतच या पुलाची अवस्था इतकी बिकट झाली आहे की,रस्त्या वरील कॉंक्रिट तडे गेले असून सिमेंट पूर्णपणे वेगळे होऊन खड्डे पडताना दिसत आहेत. बाजूचे गटार भाग खचू लागले आहेत.या पुलावरून बस,आणि इतर वाहनांची बस स्थानकात जाण्या- येण्या साठी रहदारी नियमित याच मार्गाने होत असल्याने अकस्मात दुर्घटनेचा धोका वाढला आहे.सहा महिन्यांपूर्वीच हा पुल रहदारीसाठी सुरु झाला होता.दुसऱ्या बाजूचा पूल वाहतुकी साठी सुरु होण्याच्याच दिवशी पहिलीच बस गेली आणि पुलाचा काही भाग खचला,त्यावेळी बस पुलात अडकून पडल्याची घटना घडली होती.आज पुन्हा त्याच अवस्थेत पूल दिसत असल्याने इतक्या कमी कालावधीतच पूल खराब कसा झाला? असा ज्वलंत सवाल नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की,बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले,तसेच कामात बेफिकिरी झाल्याने पुलाची अशी दुरवस्था झाली आहे. एचपीएम कंपनीला कोणी जाब विचारणार का ? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की,शासन आणि संबंधित विभाग एखादी दुर्घटना घडल्याशिवाय हालचाल करत नाहीत.त्यामुळे प्रशासनाने तातडीने तपासणी करून पूल दुरुस्त करावा,दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकां कडून होत आहे.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत बिरसा मुंडा जयंती साजरी

केज/प्रतिनिधी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेत मुंडा जमातीचे लोकनायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त दि.१५ नोव्हेंबर २०२५ शनिवार रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले.बिरसा मुंडा यांचा जन्म झारखंड मधील उलीहातु येथे दि. १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झाला.बिरसा मुंडा हे १९ व्या शतकातील एक आदिवासी स्वातंत्र्यसैनिक व मुंडा जमातीचे लोकनायक होते.ज्यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध आणि जमिनदार जमात वाद्या विरुध्द संघर्ष केला. त्यांनी 'उलुगान' (मोठी चळवळ)चे नेतृत्व केले. त्यांनी आदिवासींच्या हक्कासाठी लढा दिला. त्यांना धरती आबा म्हणून ओळखले जाते.बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस राष्ट्रीय आदिवासी गौरव दिवस साजरा केला जातो.असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड



मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.या शाळेचे प्राथमिक पदवीधरशिक्षक श्री डॉ.रामकिशन मुळे सर,श्री लोंढे आकाश दत्तु सर ,श्री संदीप ठोंबरे सर, श्री राहुल बजरंग बचुटे सर,श्री.आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती निलावती आनंदराव भोरे मॅडम, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम,ट्रेनी शिक्षिका रोहिणी काळे मॅडम यांनी सविस्तर माहिती दिली.बिरसा मुंडा यांना भगवान मानलेजाते. त्यांच्या जयंतीनिमित्त शाळेत विद्यार्थ्यांचे विविध उपक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री राहुल बजरंग बचुटे सर यांनी केले व श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम यांनी आभार मानले



## बीड जिल्हा सहकार बोर्डाचे कार्य सर्वोत्कृष्ट - प्रा.बबनराव आंधळे

बीड/प्रतिनिधी

दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुंबई येथील वसंत दादा पाटील सभागृहांमध्ये आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त ७२ व्या अखिल भारतीय सहकार सप्ताहा निमित्त मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुंबई व मुंबई जिल्हा सहकार बोर्डाच्या संयुक्त विद्यमाने आयोजितसंपूर्ण महाराष्ट्रातील विभागीय सह मंडळ जिल्हा सहकार बोर्ड अधिकारी व पदाधिकारी चर्चासत्र मुंबई या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य सहकार संघाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य सहकार संघाचे अध्यक्ष प्रवीणजी दरेकर हे होते तर उद्घाटक म्हणून महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष श्री.राहुलजी नार्वेकर हे होते या कार्यक्रमांमध्ये तीन शालेय विद्यार्थ्यांना वक्तृत्व स्पर्धेमध्ये राज्यात प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक आलेल्या शालेय विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यामध्ये बीड जिल्हा सहकार बोर्डाचे कार्य हे उत्कृष्ट असल्यामुळे बीड जिल्हा सहकार बोर्डाला देखील सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले यावेळी जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे व सहकार विकास अधिकारी राम वाघमारे हे उपस्थित होते या कार्यक्रमासाठी पूर्ण महाराष्ट्रातील सहकार बोर्डाचे अध्यक्ष उपाध्यक्ष संचालक व सहकार अधिकारी उपस्थित होते मुंबई जिल्हा सहकार बोर्डाने व जिल्हा बँकेने मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले व कार्यक्रम योग्य रित्या पार पाडला या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मुंबई जिल्हा सहकार बोर्डाचे अध्यक्ष यांनी आभार मानले व कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

# जालना अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाची मिशन-सक्सेस कारवाई

बेपत्ता मुलगी परत मिळाली आरोपीला हातकडी गुन्हेगारीवर पोलिसांचा दमदार दणका

फारुक शेख : जिल्ह्यात गुन्हेगारीच्या मुसक्या आवळणाऱ्या जालना अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने पुन्हा एकदा आपली किंमत सिद्ध केली आहे.एक वर्षापासून गायब असलेली अल्पवयीन मुलगी शोधून काढत तिला पळवून नेणाऱ्या आरोपीला लोखंडी बांगड्या घालून पोलिसांनी गुन्हेगारीला थेट फटका दिला आहे. ही कारवाई म्हणजे जिल्हा पोलीस दलाच्या नोंदीतील एक धडाडीची निर्णायक आणि समाजाला दिलासा देणारी मोहीम ठरली आहे.गुन्हा नोंद झाला पण मुलगी गायबच परतूर पोलिस ठाण्यात ३० नोव्हेंबर २०२४ रोजी तक्रार दाखल झाली होती परतूर येथील एका अल्पवयीन मुलीस फूस लावून जळगाव जिल्ह्यातील रुपजी नगर येथून पळवून नेण्यात आले. गुन्हा गंभीर, परंतु मुलगी व आरोपीचा कणभरही ठावठिकाणा लागत नव्हता. तपास एका अडगळीत अडकला होता वेळ जात होता आणि मुलीच्या कुटुंबाचे डोळे सतत दारात.पोलीस अधीक्षकांचा निर्णायक आदेश तपास -ढउ कडे १८ ऑगस्ट २०२५



रोजी जालना जिल्ह्याचे मा.पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांनी हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडे वर्ग केला.आणि काय तपासाने अचानक वेग पकडला -ढउ पथकाने सायबर ट्रॅकिंग, तांत्रिक पुरावे, गुप्त माहितीदारांचे जाळे आणि हालचालींची गोपनीय नोंद यावर जलद काम सुरू केले. पुण्यात आरोपीचा ठावठिकाणा - ढउ ची धडक एंट्री तपासात मोठा ब्रेकथ्रू मिळाला आरोपी धर्मा आत्माराम कोळी हा पीडित मुलीसह इंदावाडी ता.पुरंदर, पुणे येथे लपल्याचे खात्रीशीर पुरावे मिळाले.-ढउ पथकाने एक मिनिटही न घालवता पुण्याकडे कूच केली आणि इंदावाडीमध्ये थेट धडक कारवाई करण्यात आली आरोपी जेरबंद अल्पवयीन मुलगी सुरक्षित आणि एक वर्षांपासून डोळ्यांत पाणी रोखून बसलेल्या घराला मिळाला दिलासा! कारवाईनंतर आरोपी व पीडितेला परतूर पोलिसांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले.धडाडीच्या पथकाला वरिष्ठांचे मनभरून कौतुक या अचूक तडाखेबंद आणि संवेदनशील कारवाईबद्दल मा.पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल मा.अप्पर पोलीस अधीक्षक नागु पांढरे यांनी पथकाचे विशेष कौतुक केले.ही टीम म्हणुनच ओळख आणि भीतीही उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी,पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पो.अंमलदार गणेश शिंदे, पो.अंमलदार पवन जोशी, पो.अंमलदार संजय गवळी, पो.अंमलदार प्रदीप देठे, पो.अंमलदार सागर बाविस्कर सायबर सेल,महिला अंमलदार संगीता चव्हाण,महिला अंमलदार पुष्पा खुदमोल, महिला अंमलदार आरती साबळे,महिला अंमलदार रेणुका राठोड,चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांनी केली आहे

# भानुदास दोबाले यांना एम.फिल. पदवी अण्णाभाऊ साठे साहित्यावरील महत्त्वपूर्ण संशोधनाला मान्यता

फारुक शेख :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या आंतरविद्या शाखेअंतर्गत जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागातील विद्यार्थी भानुदास लक्ष्मण दोबाले यांनी आपल्या संशोधन प्रवासात एक मोठी झेप घेत एम.फिल. चरींशी ेष झहळश्रोहि ही पदवी प्राप्त केली आहे. सामाजिक आणि साहित्यिक संदर्भांनी परिपूर्ण असलेल्या त्यांच्या संशोधनाला विद्यापीठाची प्रतिष्ठित मान्यता मिळाली असून हे यश सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे.

दोबाले यांच्या शोधप्रबंधाचा विषय साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून मागास समाजाला मिळालेली वैचारिक भूमिका एक संवादशास्त्रीय अभ्यास हा अभ्यास विषय सामाजिक न्याय, वंचित वर्गाचे सक्षमीकरण आणि साहित्याच्या बदल घडविणाऱ्या प्रभावशक्तीचे अत्यंत प्रभावी उदाहरण मानला जातो.दोबाले यांनी साठे यांच्या कथा,कादंबऱ्या,लावण्या या विविध साहित्यप्रकारांमधून उभे राहणाऱ्या तळागाळातील व्यक्तीरेखांचे सखोल विश्लेषण केले.साठे यांच्या लेखनात प्रकट होणारी सामाजिक समतेची जाणीव वंचित समाजाला मिळालेला वैचारिक आधार संघर्षातून उभा राहिलेला नवा आत्मविश्वास या सर्वांवर त्यांनी चिकित्सक दृष्टिकोनातून प्रकाश टाकला आहे. त्यांच्या अभ्यासामुळे अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची



सामाजिक ताकद आणि संवादशास्त्रीय महत्त्व अधिक ठळकपणे उलगडले आहे.या संशोधनासाठी विभागप्रमुख डॉ.दिनकर माने यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच डॉ.सोमीनाथ खाडे,डॉ.दिवाकर कुलकर्णी,डॉ. प्रसन्न पाटील यांनी अभिनंदन करत दोबाले यांच्या अभ्यासाला उच्च दर्जाची प्रशंसा दिली. दोबाले यांनी ही पदवी - ग्रेड सह प्राप्त करून आपल्या शैक्षणिक वाटचालीत विशेष यश मिळवले.

याशिवाय,आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने डॉ. आत्माराम नाटकर,मा.सरपंच शिवाजी बामणे,योगेश हेंद्रे, संतोष काकडे,बबनराव पंचलोटे, माऊली दोबोले यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत पुढील संशोधनासाठी शुभेच्छा दिल्या.सामाजिक भान जपणारे आणि विचारप्रवर्तक संशोधन पुढे यावे यासाठी भानुदास दोबाले यांचे हे यश प्रेरणादायी ठरत असून सामाजिक विषयांवरील संशोधनाचे महत्त्व




## मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी.एक्स मार्फत शासकीय आय.टी.आय. कॉलेज कळंब येथे कार्यक्रम संपन्न

कळंब/प्रतिनिधी

शासकीय आय.टी.आय. कॉलेज कळंब येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम. सी.एक्सच्या माध्यमातून आय.टी.आयच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य श्री के. जे.पवार सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थितविद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना डिमॅट अकाउंट,फायनान्शियल मार्केट्स,कमोडिटीचे प्रकार,जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज,वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन क्ट, कमोडिटी व इक्विटी मध्ये असलेला फरक,तसेच सेबीच्या सारथी प चे महत्व इत्यादीचे मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्या साठी प्रा.एस.जी. दंडनाईक,बी.एम.उदबुके सर यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन केले.तसेच या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीडमध्ये कॉफी सेंटरवर धाड, आरोपी विरुद्ध कारवाई

बीड ।प्रतिनिधी

बीड शहराच्या माने कॉम्प्लेक्स परिसरात असलेल्या क्लासिक कॉफी सेंटरवर अनैतिक मानवी प्रतिबंधक पथकाच्या फौजदार पल्लवी जाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी धाड टाकली. यामध्ये कॉफी सेंटरच्या चालकाविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत माने कॉम्प्लेक्स परिसरात कॉफी सेंटर दुकानामध्ये बेकायदेशीर कृत्य होत असल्याच्या तक्रार करण्यात आली होती. मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी एचटीयुएच च्या पथकाने अचानक धाड टाकून दोन मुले आणि तीन मुलींना ताब्यात घेतले. या सर्वांना शिवाजीनगर पोलिस ठाण्यात आणून त्यांच्या विरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. क्लासिक कॉफी सेंटरचा साल का विरुद्ध कारवाई करून त्याला नोटीस बजावण्यात आली आहे. तर घटनेतील अन्य जणांवर प्रतिबंधात्मक करावीत कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले.सदर कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवीय वाहतूक प्रतिबंधक पथकाच्या फौजदार पल्लवी जाधव, सहाय्यक फौजदार मीरा रेडेकर, उर्मिला मस्के, जाधव, गजानन आणि त्यांच्या सहकारी पोलिसांनी केली.बीड शहरात सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स माने कॉम्प्लेक्स आदि भागात कॉफी सेंटरच्या नावाखाली अवैध गृहीत गैरकृत्य होत असल्याचे दिसून आले आहे. पोलिसांनी सुरू केलेल्या या मोहिमेचे स्वागत करण्यात आले आहे.

# धनंजय मुंडेऐवजी अजित पवारांची सभा हवी:आमदार प्रकाश सोळंकेंची मागणी

## म्हणाले - पालकमंत्र्यांकडून आमच्या काही अपेक्षा



माजलगाव /प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या स्टार प्रचारकपदी धनंजय मुंडे यांची नुकतीच नियुक्ती झाली असली तरी, माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी मात्र मतदारसंघातील नगर परिषद निवडणुकांसाठी थेट पक्षप्रमुख अजित पवार यांच्या जाहीर सभेची मागणी लावून धरली आहे. प्रकाश सोळंके यांच्या या मागणीमुळे बीड जिल्ह्याच्या राजकारणात वेगळ्या राजकीय चर्चेला तोंड फुटले आहे.

पत्रकारांशी बोलताना आमदार प्रकाश सोळंके यांनी धनंजय मुंडे यांचे स्टार प्रचारकपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले. ते म्हणाले, धनंजय मुंडे हे चांगले वक्ते आणि प्रभावी नेते आहेत. त्यांना मोठी संधी मिळाली याचा सहकारी म्हणून आनंद झाला. मात्र, माजलगाव आणि धारूर नगर परिषदेच्या प्रचारार्थ मी स्वतः उपमुख्यमंत्री अजित पवार सभेची मागणी केली आहे.

अजित पवारांच्या सभेची मागणी का?

या मागणीमागील भूमिका स्पष्ट करताना सोळंके म्हणाले, अजित पवार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्यामुळे पालकमंत्री म्हणून त्यांच्याकडून आम्हाला विकासकामांच्या आणि इतर काही अपेक्षा आहेत, हे देखील महत्त्वाचे आहे. स्थानिक निवडणुकीत मुंडेंच्या प्रचारसभेऐवजी थेट पक्षाच्या सर्वोच्च नेत्याची अजित पवारांच्या सभेची मागणी करणारे सोळंके यांचे हे वक्तव्य राजकीयदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे मानले जात आहे.

**प्रकाश सोळंकेंचे धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप**

दरम्यान, आमदार प्रकाश सोळंके नुकतेच आमदार धनंजय मुंडे यांच्यावर पुन्हा एकदा गंभीर आरोप केले होते. माजलगाव मतदार संघातील माझे विरोधक व त्यांच्याशी संबंधित असलेल्या लोकांची परळी तालुक्यातील नाथरा येथील फार्म हाऊसवर बैठका होत आहेत. याबाबतची चर्चा संपूर्ण मतदारसंघात असल्याचे प्रकाश सोळंके यांनी म्हटले. याबाबत आपण पक्षश्रेष्ठींना, अजित पवारांना यापूर्वीच कल्पना दिल्याची माहितीही प्रकाश सोळंकी यांनी दिली होती.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक प्रेरक उपक्रम सत्र मार्गदर्शन

**बीड जिल्हा प्रतिनिधी/ब्युरो अहवाल**

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक आणि विभागीय केंद्र छत्रपती संभाजी नगर महाराष्ट्र राज्य संयुक्त अस्तित्व दिनांक १७ आणि १८ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यापीठाचे मुख्यालय किंवा दोन दिवसीय प्रेरक उपक्रम सत्र मार्गदर्शन कार्यक्रम विद्यापीठ महाराष्ट्र राज्य १५७ द्वारे आयोजित केला असता केंद्रांना आमंत्रित केले**

असते किंवा एक केंद्र समन्वयक आणि एक केंद्र प्रमुख अशा दोन व्यक्तींना प्रेरणादायी सत्रासाठी मार्गदर्शन चर्चा सत्रासाठी आमंत्रित केले असते किंवा मार्गदर्शक डॉ. प्रकाश देशमुख आणि छत्रपती संभाजी हे नाशिक मुख्यालयातील कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असते. शहर विभागीय केंद्र संचालक नंदकुमार राठी आणि नोंदणी विभागाचे रजिस्ट्रार श्री. मनोज घंटा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर असलेले डॉ. प्रकाश देशमुख म्हणाले की, भारतीय मुक्त विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या इतिहासाचा आणि तुलनात्मक आढावा घेतल्यानंतर महाराष्ट्रात अनेक मुक्त विद्यापीठे स्थापन करण्याची आवश्यकता आहे. मानव विज्ञान, सामाजिक अभ्यास शाखा संचालक, वाणिज्य, व्यवसाय प्रशासन, विद्यार्थी संचालक, शिक्षणशास्त्र, विद्यार्थी संचालक, डॉ. संजीवनी महाले, संगणक विज्ञान शाखा संचालक, डॉ. चेतना कमल स्कर, कृषी विज्ञान शाखा संचालक, डॉ. माधुरी सोनवणे, आरोग्य विज्ञान. शाखा संचालक, डॉ. रश्मी रानडे, डॉ. जयदीप निकम, स्कूल ऑफ ऑनलाइन डार्लिंगचे संचालक, गणेश लोखंडे, उपस्थित सर्व पाहुणे, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. पूनम वाघ यांनी सर्वांचे आभार मानले, डॉ. दयानंद हत्ती आंबरे यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचा समारोप झाला.

# दावरवाडी येथील चंपाषष्ठी निमित्त बैठक संपन्न



दावरवाडी ।प्रतिनिधी

दावरवाडी येथील सालाबादप्रमाणे यंदाही दावरवाडी येथील श्री खंडोबा देवाची यात्रा व बारा गाड्या नियोजन तथा पाच दिवस प्रसिद्ध असलेले भजनी मंडळ यांचे भजनी गायनाचा कार्यक्रम होणार आहे चंपाषष्ठी निमित्त दावरवाडी मध्ये यात्रा मोठ्या उत्साहात खंडोबा यात्रा साजरी होते शेवटच्या दिवशी ह. भ .प रामायण चार्य नामदेव महाराज पोकळे यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन व महाप्रसाद होणार खंडोबा भक्त साहेबराव धारे यांच्या हस्ते बारा गाड्यांचे पाटपूजन करून बारा गाड्या ओढण्यात येतात संध्याकाळी राडीचे जागरण होते या सर्व कार्यक्रमाचे नियोजन साठी ही आज चंपाषष्ठी बैठक बसवण्यात आली होती या बैठकीचे नियोजन यात्रा कमिटीने केले होते

# अंकुशराव टोपे महाविद्यालयात श्रीमती इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त प्रेरणादायी कार्यक्रम



फारुक शेख :- जालना अंकुशराव टोपे महाविद्यालयात भारताच्या पहिल्या आणि अद्वितीय महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची १०८ वी जयंती उत्साहात आणि गौरवपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना परिसरात देशभक्तीची आणि प्रेरणेची भावना दाटून आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दादासाहेब गजहंस यांनी इंदिरा गांधी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाची कठिन प्रसंगांत घेतलेल्या धाडसी निर्णयांची आणि देशाला दिलेल्या दिशा-दर्शक योगदानाची प्रशंसनीय उजळणी केली.

यावेळी प्रमुख पाहुणे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील यांनी इंदिराजींच्या राजकीय प्रवासातील टप्पे राष्ट्रीय सुरक्षेसाठी घेतलेले निर्णय तसेच भारताच्या जागतिक ओळखीला दिलेली बळकटी यावर प्रभावी भाष्य केले.कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा.पांडुरंग खोजे,डॉ. शंकर तिकांडे,कार्यालयीन अधीक्षक श्री.सुरेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन डॉ.संतोष करवंदे यांनी केले, तर कृतज्ञतापर शब्द प्रा.रामप्रसाद भालेकर यांनी व्यक्त केले.महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत राष्ट्रकर्त्या नेत्या इंदिरा गांधी यांच्या कार्यकर्तृत्वाला अभिवादन करत जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

# बोडखे परिवाराच्या संस्कारातून पुढे आलेली हसतमुख जोडी

## चि.रियांश आणि चि. आदिराजच्या वाढदिवसासाठी उत्सुकता




आष्टी (प्रतिनिधी)

कुंभार ज्याप्रमाणे आपल्या मातीतून आपल्या सुंदर हस्तकला बनवतो, नूतन अत्यंत उपयोगी वस्तू बनवतो. अनेकदा त्यातून तेजस्वी प्रकाश पणती देते तर अनेक जण माठातून थंडगार पाणी पिऊन तृप्त होतात; तर अशाच अनेक कुटुंबातून आपल्या संस्कारक्षम पवित्र शिक्षणातून राष्ट्राची पिढी निर्माण होते.घरातील योग्य संस्कार,शांत,संयमी,बंधुत्व, ऐक्य विचारशील अशा मूल्यात्मक बाबींना सदैव सोबत ठेवत मुलांवर योग्य संस्कारातून सक्षमपणे घडवले जाते.बीड जिल्ह्याच्या आष्टी येथील बोडखे परिवार हा संस्कार परिवार म्हणून ओळखला जातो.गेल्या २५ वर्ष निरंतर पत्रकारितेमध्ये अध्यात्म शिक्षण समतोल राजकीय आणि सामाजिक लिखाण यातून दमदारपणे पाऊल ठेवून पुढे जाणारे व्यक्तिमत्व.त्यांच्या सौभाग्यवती शिक्षिका सौ. बबीताताई बोडखे या पवित्र शिक्षण क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत.मुलगी डॉक्टर, एक मुलगा शिक्षक,दुसरा व्यवसायामध्ये अत्यंत प्रामाणिकपणे कर्तव्यरत असतात.उत्तमराव बोडखे यांच्या संस्कारक्षम परिवारातील नातवंडे अर्थात हसतमुख जोडी असलेले चि.रियांश व चि. आदिराज हे भविष्यातील सक्षम वारसदार असतीलच..किंबहुना या परिवारातील संस्कारातून एक चांगला सक्षम नागरिक मात्र नक्की बनतील अशा या छोट्या जोडीचा आज २० नोव्हेंबर २५ रोजी गुरुवारी वाढदिवस आहे.या हसतमुख,निखळ,नटखट तेजस्वी उमेदीचा चेहरा असलेल्या या जोडीला शुभेच्छा देण्यासाठी बोडखे परिवारावर प्रेम करणाऱ्या विविध क्षेत्रातील असंख्य गुणीजनांची उत्सुकता हा मौल्यवान क्षणाचा भाग आहे.गेल्या अनेक दशकापासून अनेकांच्या आनंदी क्षणामध्ये स्वतःला झोकून देत त्यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा यासह अनेक पारिवारिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होत योगदान देणाऱ्या बोडखे परिवारातील या आनंददायी वाढदिवस सोहळ्यासाठी खूप खूप शुभेच्छा..!!

# स्वस्त धान्य दुकानदारांसाठी कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न

मंठा येथे डारीं ऋझड उपक्रमाचा शुभारंभ

डॉ आशिष तिवारी/मंठा - अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि महाउद्यमी स्किल्स लिमिटेड (रिअल मार्ट स्टोअर) यांच्या संयुक्त विद्यमाने स्वस्त भाव दुकान चालकांसाठी कौशल्य वाढ व डिजिटल विक्री या विषयावरील कार्यशाळा मंठा तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आली.



कार्यशाळेत स्वस्त धान्य दुकान चालकांना आधुनिक विक्री तंत्र, डिजिटल पेमेंट प्रणाली, स्टार्टअप उत्पादनांचे थेट विक्री तंत्रज्ञान, तसेच पुरवठा व्यवस्थापन याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.उद्योजक अमोल शिंदे यांनी व्होकल फॉर लोकल, डिजिटल स्टोअर संकल्पना, वेअरहाऊस व्यवस्थापन आणि स्वतःचा उद्योग उभारणी याबाबत सविस्तर माहिती दिली. दैनंदिन वापरातील २० हून अधिक स्थानिक स्टार्टअप उत्पादनांच्या विक्रीला देखील प्रारंभ झाला.

या उपक्रमामुळे स्वस्त धान्य दुकाने आता डिजिटल स्टोअरमध्ये रूपांतरित होणार असून कार्डधारकांना उत्तम दर्जाची उत्पादने कमी किमतीत उपलब्ध होतील. तसेच स्थानिक उद्योजकांसाठीही बाजारपेठेचा नवा मार्ग खुला झाला आहे.

कार्यक्रमाला तहसिलदार सुमन मोरे, महाउद्यमी स्किल्स लिमिटेडचे संचालक अमोल मुके, तालुका पुरवठा अधिकारी विकास राजपूत, श्वेता टोकेकर, कविता सोनटक्के, पांडुरंग सूलताने, स्वस्त धान्य दुकानदार संघाचे अध्यक्ष विठ्ठलराव काळे, शिवाजी बोराडे, दादाराव हिवाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# दर्श अमावस्येनिमित्त तळणीतील दत्त मंदिरात भाविकांची गर्दी; मातोश्री मित्र मंडळाचा भव्य भंडारा

तळणी /प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील प्रसिद्ध पूर्णा नदीवरील दत्त मंदिर संस्थान, तळणी (भोलानाथ गड) येथे दर्श अमावस्येनिमित्त बुधवारी (ता.१९) भाविकांची मोठी मांदियाळी उसळली. पवित्र अमावस्या आणि शुभ मुहूर्तामुळे सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

यानिमित्त मातोश्री मित्र मंडळ यांच्या वतीने भव्य भंडारा (महाप्रसाद) आयोजित करण्यात आला होता. दुपारपासून सुरू झालेल्या या महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला.

या कार्यक्रमाची सुरुवात दत्त मंदिर (भोलेनाथ गडाचे) महंत चरणदास महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत अन्नदान संकल्पाने झाली. अन्नदान हे



सर्वश्रेष्ठ दान आहे. पवित्र दिवशी केलेले अन्नदान अधिक पूण्यदायी ठरते, असे मत त्यांनी व्यक्त केले. मातोश्री ग्रुपच्या सामाजिक कार्याचेही त्यांनी विशेष कौतुक केले.

शिस्तबद्ध गर्दी - भक्तीमय वातावरण

अमावस्येनिमित्त दर्शनासाठी भाविकांनी सकाळीपासूनच शिस्तबद्ध रांगा लावल्या होत्या. मंदिर परिसर भक्तीमय वातावरणाने दुमदुमत होता. संपूर्ण परिसरात दिवसभर भाविकांची ये-जा सुरू होती.

भंडाऱ्याच्या यशस्वी आयोजनासाठी मातोश्री मित्र मंडळातील तरुणांनी मेहनत घेतली. नेमिनाथ सरकटे, दिपक सरकटे, पंकज देशमुख, नागेश गुजर, संदीप खंदारे, रामेश्वर खंदारे, योगेश खंदारे, कैलास आळंदकर, तुषार खरात, अभिजीत सदावर्ते, वैभव कांगणे, गणेश कांगणे, शेषनारायण सरकटे, प्रकाश घोडसर, राहुल सरकटे यांसह अनेक तरुणांनी दिवसभर भंडाऱ्याची जबाबदारी सांभाळली.

संध्याकाळपर्यंत चाललेल्या या अन्नदान सोहळ्यात परिसरातील अनेक गावांतील भाविकांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवला. धार्मिक उत्साह, सामाजिक उपक्रम आणि भक्तीभावाच्या वातावरणात कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : ई-केवायसीची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत वाढ




डॉ आशिष तिवारी/मंठा या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यभरात यशस्वीरित्या राबवली जात असून पात्र लाभार्थींना दिलासा देत राज्य सरकारने योजनेतील ई-केवायसी करण्याची अंतिम मुदत वाढवली आहे. यापूर्वी १८ नोव्हेंबर २०२५ ही अंतिम तारीख जाहीर करण्यात आली होती. मात्र राज्यात आलेल्या नैसर्गिक आपत्तींसह विविध अडचणींमुळे अनेक लाभार्थींना वेळेत ई-केवायसी करता आली नाही. त्या पार्श्वभूमीवर अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५पर्यंत वाढवण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली ही योजना सुचारूपणे अंमलात आणली जात आहे.

दरम्यान, ज्या लाभार्थी महिलांचे पती किंवा वडील हयात नाहीत अथवा घटस्फोट झाला आहे, त्यांनी स्वतःची ई-केवायसी करून मृत्यू प्रमाणपत्र किंवा घटस्फोट प्रमाणपत्र / न्यायालयाचा आदेश यांची सत्यप्रत संबंधित जिल्ह्यातील महिला व बालविकास अधिकाऱ्यांकडे जमा करणे आवश्यक आहे. या निर्णयामुळे लाभाच्या वितरणातील पारदर्शकता आणि अखंडता कायम राहील, असा विश्वास शासनाने व्यक्त केला आहे.


राज्य सरकारने अद्याप ई-केवायसी न केलेल्या सर्व पात्र भगिनींना विस्तारित मुदतीचा लाभ घेऊन ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.

# वंचित बहुजन आघाडीचे केज शहराध्यक्ष पत्रकार बाबासाहेब मस्के यांची

## सुजात (दादा) आंबेडकर यांनी घेतली सदिच्छा भेट

केज/प्रतिनिधी


वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष तसेच रोखठोक न्यूजचे संपादक बाबासाहेब मस्के यांच्या कॅन्सरची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली असून सध्या ते उपचार घेत आहेत.त्यांच्या प्रकृतीची पाहणी करण्या साठी व त्यांना मनोबल देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात (दादा) आंबेडकर यांनी अंबाजोगाई येथे त्यांच्या राहत्या घरी भेट दिली.या भेटीदरम्यान सुजात दादांनी मस्के यांची तब्येत जाणून घेतली,त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली आणि त्यांच्या लवकरात लवकर पूर्ण प्रकृतीस सुधारणा होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.तसेच पक्षाच्या व वैयक्तिक पातळीवरील सर्व



सहकार्याची हमीही दिली.

बाबासाहेब मस्के हे पत्रकारितेसोबतच सामाजिक प्रश्नांवर रोखठोक भूमिका घेण्यासाठी ओळखले जातात.त्यांच्या प्रकृती बाबत पक्षातील कार्यकर्त्यांसह सामाजिक क्षेत्रातही चिंता व्यक्त होत होती.सुजात आंबेडकर यांच्या भेटीमुळे कार्यकर्त्यांमध्ये एक सकारात्मक संदेश गेल्याचे वातावरण दिसून आले.बाबासाहेब मस्के यांनीही या भेटीबद्दल समाधान व्यक्त केले असून,लवकरच पूर्ववत कार्यरत होण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.त्यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी, यासाठी विविध स्तरांवरून शुभेच्छांचा ओघ सुरू आहे.यावेळी बाबासाहेब मस्के यांच्या पत्नी यावेळी उपस्थित होत्या.त्यांना सुजात दादा यांनी धीर देत काळजी घ्यावी असा सल्ला दिला आहे.

# विलास जाधव बीड जिल्हा परिषदेचे प्रभारी सीईओ



बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान हे खाजगी कामानिमित्त रजेवर गेले आहेत. त्यामुळे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त पापळकर यांनी दिनांक १९ रोजी सदर आदेश काढले आहे. जितिन रहमान हे दि.३० नोहेंबर २०२५ पर्यंत रजेवर आहेत.



# राज्यस्तरीय शिक्षक वक्तृत्व स्पर्धेत शिंदे डी एस यांचे उत्कृष्ट वक्तृत्व संपन्न

वडवणी (प्रतिनिधी)

बीड येथील नालंदा फाउंडेशन च्या वतीने भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रव्यदिनानिमित्त राज्यस्तरीय शिक्षकासाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन प्राध्यापक प्रदीप रोडे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते या वक्तृत्व स्पर्धेत महाराष्ट्रातील दिग्गज शिक्षक वक्त्यांनी सहभाग नोंदवला होता या वक्तृत्व स्पर्धेत वडवणी येथील डॉक्टर सोनाजीराव रांजण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे कर्तव्यदक्ष व कर्तव्य परायण सहशिक्षक श्री शिंदे डी.एस. यांनी अतिशय उत्कृष्ट विचार व्यक्त केले विचार व्यक्त करत असताना त्यांनी मूल्य शिक्षण संस्कारात शिक्षकांची भूमिका या विषयावर अतिशय चांगले विचार व्यक्त केले.वास्तविक पाहता मूल्य शिक्षण रुजवत असताना कोवळ्या मनावर योग्य वेळी ते बिंबविणे किती आवश्यक आहे याचे सोदाहरण अतिशय चांगल्या भाषेत त्यांनी वक्तृत्व सभागृहासमोर मांडले .

यावेळी गुणलेखक म्हणून प्राध्यापक संजय बागुल ,.प्राध्यापक किर्दत सर ,प्राध्यापक सदाफुले सर यांनी गुणलेखकाचे काम केले यावेळी प्राध्यापक राम गायकवाड प्राध्यापक प्रदीप रोडे,प्राचार्य व्ही एस बांदल ,प्राचार्य डी जी निकाळजे हे मान्यवर उपस्थित होते श्री शिंदे यांनी वक्तृत्व शैली मध्ये उत्कृष्ट वक्तृत्व व्यक्त केले याबद्दल त्यांचे अभिनंदन

# तळणी गटात भाजपाची मोहीम; लोणीकरांचा लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी थेट संवाद

## उमेदवारांची सखोल तपासणी, बूथबळकटी व रणनीतीवर भर; जि.प. निवडणुकीत चुरस वाढवणारी भाजपाची तयारी

(तळणी वार्ताहर)

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने जोरदार तयारीला सुरूवात केली आहे. त्याचाच भाग म्हणून आमदार बबनराव लोणीकर यांनी मंठा तालुक्यातील तळणी जिल्हा परिषद गटांमध्ये कार्यकर्ते व इच्छुक उमेदवारांसोबत थेट संवाद साधला. ता. १८ रोजी तळणी येथील श्री नेमिनाथ महाराज मंदिर परिसरात आयोजित या बैठकीस मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.



उमेदवारी निश्चित करताना उमेदवाराने गटातील सर्व गावांशी संपर्क प्रस्थापित केला आहे का, दोन वर्षांपासून पूर्वतयारी केली आहे का, लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होतो का, गावोगावी होणाऱ्या सप्ताहात व अन्य कार्यक्रमांत हजेरी लावतो का, यांसारख्या मुद्यांची कसून पडताळणी केली जाते, असे आमदार लोणीकरांनी सांगितले. इतर पक्षांप्रमाणे आमच्याकडे तिकीट वाटप मनमानी पद्धतीने होत नाही. सर्व तळागाळातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा करूनच निर्णय घेतला जातो, म्हणूनच आमचा विजय हमखास ठरतो, असेही ते म्हणाले.

बैठकीत इच्छुक उमेदवारांच्या जिंकण्याच्या क्षमतेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बूथस्तरीय संघटन मजबूत करणे, मतदारसंपर्क वाढवणे आणि योग्य उमेदवार निवडणे या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती, स्थानिक समस्यांची नोंद आणि निवडणूक-रणनीतीचे मार्गदर्शनही लोणीकरांनी केले.

जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपाची ही गतिमान मोहीम सुरू झाल्याने मंठा तालुक्यातील राजकीय वातावरणात चुरस निर्माण झाली असून इतर पक्षांना देखील रणनीती आखण्याची धांदल उडाली आहे.

बैठकीस भाजपा तालुकाध्यक्ष नितीन राठोड, उपाध्यक्ष शरद पाटील, गजानन देशमुख, नाथराव काकडे, डॉ. दत्तात्रय काकडे, गोविंदराव देशमुख, रामेश्वर देशमुख, नितीन सरकटे, सरपंच कृष्णा खंदारे, सुनील कांगणे, दत्तात्रय कांगणे, प्रदीप चाटे, सुरेश सरोदे, रामकिसन बोडखे, विलास घोडके, नवनाथ खंदारे, माजी सभापती राजेश मस्के, किशोर हाणवते, मनोज देशमुख, भगवान सरकटे, अशोक राठोड, केशव येउल, आबासाहेब सरकटे, राम देशमुख, भगवान देशमुख, ज्ञानेश्वर राठोड, शरद सरकटे यांच्यासह मोठ्या संख्येने भाजपा समर्थक उपस्थित होते.



## मल्टी कमोडिटी एक्सचेंज (एम.सी.एक्स.) मार्फत शासकीय आय.टी.आय. कॉलेज वडवणी येथे कार्यक्रम संपन्न.

बीड/प्रतिनिधी

शासकीय आय.टी.आय. कॉलेज वडवणी येथे भारतसरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम. सी.एक्सच्या माध्यमातून आय.टी.आय च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य श्री एस. ओ.बनगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना डिमॅट अकाउंट,फायनान्शियल मार्केट्स,कमोडिटीचे प्रकार,जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज,वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन क्ट, कमोडिटी व इक्विटी मध्ये असेल असलेला फरक, तसेच सेबीच्या सारथी प चे महत्व याचे मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्या साठी प्रा.एम.एच.मोमीन सर,एस.एल.राठोड सर यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले व सौ.एस.डी ठोंबरे मॅडम यांनी सूत्रसंचालन केले.तसेच या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नाफेडचे सोयाबीन खरेदी केंद्र नानसी पुनर्वसन येथे सुरू

हमीभाव ५,३२८ रुपये, शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे : आमदार लोणीकर

डॉ आशिष तिवारी/मंठ

नानसी पुनर्वसन येथे नाफेड अंतर्गत सोयाबीन खरेदी केंद्राचे उद्घाटन परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले.यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांकडून ५,३२८ रुपये प्रति क्विंटल या हमीभावाने सोयाबीन खरेदी केली जाणार असल्याची माहिती आमदार लोणीकर यांनी दिली. संपूर्ण खरेदी प्रक्रिया पारदर्शक राहील व पैसे थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले जातील, अशी त्यांनी ग्वाही दिली.

आमदार लोणीकर म्हणाले,शेतकऱ्यांनी माल स्वच्छ व कोरडा ठेवावा. ई-केवायसी पूर्ण करून, आधारकार्ड, ७/१२ उतारा व बँक पासबुक सोबत ठेवावे. नाफेडकडून आलेल्या एसएमएस किंवा टोकननुसारच माल आणावा.या खरेदी केंद्रामुळे परिसरातील हजारो शेतकऱ्यांना बाजारातील अनिश्चिततेपासून दिलासा मिळेल व हमीभाव निश्चित मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाला संदीप गोरे, सतीशराव निर्वळ, अंकुशराव अवचार, पंजाबराव बोराडे, बाबुराव शहाणे, कैलास बोराडे, आनंद जाधव, आप्पासाहेब निर्वळ, दिलीपराव अवचार, माऊली निर्वळ, , हेमंत निर्वळ, संतोष वायाळ, प्रल्हाद वाटाणे, हरिभाऊ देशमुख, एकनाथ खरात, सुरेशराव अवचार, मुस्तफा पठाण, दिनकर अवचार तसेच शेतकरी विनोद आवचार व विष्णू बुधवंत आदींची उपस्थिती होती.

# जालना जिल्ह्यात मोसंबीला कवडीमोल भाव संतापलेल्या शेतकऱ्याचा थरारक निर्णय अडीच एकर बागेवर फिरवला जेसीबी

## शेतकऱ्यांच्या जखमेची ती भळभळती कोण जाणार हेच आजचं वास्तव

फारुक शेख :- मोसंबी उत्पादक जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या व्यथा संताप आणि आर्थिक संकटाचा चरमबिंदू गाठणारी धक्कादायक घटना घडली आहे.अंबड तालुक्यातील बारसवाडा येथील शेतकरी पांडुरंग पाटील गटकळ यांनी बाजारातील कवडीमोल भावामुळे प्रचंड नैराश्येत २.५ एकर मोसंबी बागेवर थेट जेसीबी फिरवत आपला संताप व्यक्त केला आहे.

या घटननेने जालना जिल्ह्यातील मोसंबी उत्पादकांच्या हालअपेष्टांवर पुन्हा एकदा प्रकाश टाकला आहे.

मोसंबीला दहा ते पाच रुपये किलो भाव खर्चाच्या वासालाही नाही पोचत जालना,अंबड परिसरातील मोठ्या प्रमाणावर मोसंबी लागवड.हजारो रुपये खर्च करून झाडांची निगा राखणारे,औषध-फवारणी,खत, मजुरी सगळ्यावर पैसा खर्च करणारे शेतकरी आज बाजारात किलोला फक्त दहा-पाच रुपये भाव पाहत आहेत.

**हा भाव तर लागवड खर्चाच्या पायरीला स्पर्श तरी करतोय का ? नाही.**

याचाच परिणाम-उत्पादन वाढतंय, भाव कोसळतोय, बाजारात व्यापारी मनमानी करतायत आणि सरकारकडून ठोस धोरण शून्य. या परिस्थितीत शेतकऱ्याला उरते ते फक्त निराशा.झाडे वाढवली सांभाळली पण फळाच्या किमतीने कंबर मोडली शेतकऱ्यांची हळहळ


पांडुरंग पाटील गटकळ यांनी वर्षानुवर्षे परिश्रम घेऊन उभी केलेली २.५ एकरांची हिरवीगार मोसंबी बाग आज जमिनीशी सपाट झाली आहे.एकेक झाड जसं जेसीबीखाली कोसळत होतं, तसं तसं किसानाच्या मनातला विश्वासही कोसळत होता.हा फक्त एका शेतकऱ्याचा नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यातील मोसंबी उत्पादकांच्या विवंचनेचा चेहरा आहे.

**सरकारला कधी दृष्टी येणार ? हमीभाव कुठेय? उत्पादनाला बाजार का मिळत नाही ? संतप्त प्रश्न**

शेतकऱ्यांना हमीभाव नाही बाजार व्यवस्थापन नाही निर्यात वाढवण्याचे कोणतेही ठोस धोरण नाही.दरम्यान व्यापाऱ्यांची मक्तेदारी दलालांचे वर्चस्व आणि थंड साठवण सुविधांचा अभाव या सगळ्यांचा फटका थेट शेतकऱ्यावर.

मोसंबीच्या बाजारात भाव एखाद्या खेळण्यासारखे उलाढाली करतात आणि त्याची किंमत मोजतात ते फक्त आणि फक्त शेतकरी.

जालना जिल्ह्यातील शेतकरी टाचा वर परिस्थिती हाताबाहेरजालना हा राज्यातील सर्वात मोठा मोसंबी पट्टा.पण उत्पादन वाढलं तसं बाजारभाव कोसळले,आणि सरकारी धोरणे कोलमडली.अनेक शेतकरी मोसंबीची झाडेतोड करत आहेत काही बागा सोडून देत आहेत



तर काही जण आज पांडुरंग गटकळ यांच्यासारखा टोकाचा निर्णय घेत आहेत.

शेतकऱ्यांच्या वेदनेला उत्तर नाही तर उपाय हवाही घटना म्हणजे फक्त बातमी नाही, तर शासन आणि प्रशासनासाठी इशारा आहे.

मोसंबी उत्पादकांना किमान आधारभाव, प्रक्रिया उद्योग, निर्यात साहाय्य, थंड साठवण व्यवस्था आणि बाजार नियंत्रणावरील कठोर नियम यांची तातडीची मागणी आता डोकं वर काढत आहे.

**शेतकरी पिकवतो, पण बाजार ठरवतो ही विडंबना कधी संपणार?**

जालना जिल्ह्यातील मोसंबी उत्पादकांची व्यथा बघता या प्रश्नाचं उत्तर सरकार देणार की अजून एखादी बाग जेसीबीखाली जाणार ?

## जालना निवडणुकांची रणधुमाळी सुरू

# शिवसेनेत उमेदवारी अर्जांची धडाकेबाज बहार भाग्यनगर कार्यालयात कार्यकर्त्यांची झुंबड

फारुक शेख :-

जालना जिल्हा परिषद,पंचायत समिती आणि जालना महानगरपालिका निवडणुकांची रणशिंगे वाजताच शिवसेना एकनाथ शिंदे गट मध्ये तुफान उत्साह उसळला आहे. उमेदवारी अर्जांची धडाक्यात सुरुवात होताच भाग्यनगर येथील शिवसेना संपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांची अक्षरशः रांग लागली.पक्षात उत्साह,स्पर्धा आणि शक्तिप्रदर्शनाचा जणू स्फोटच पहायला मिळत आहे.

वरिष्ठ नेतृत्वाचा आदेश शिवसेना रणांगणात सज्ज उपमुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे,शिवसेना नेते खा.श्रीकांत शिंदे,उपनेते आ. अर्जुन खोतकर,तसेच आमदार हिकमत उढाण यांच्या सूचनांनुसार ही प्रक्रिया सुरू झाली असून जिल्ह्यातील सर्व प्रभाग,गण व विभागांतून अर्जांचा महापूर सुरू झाला आहे.या अर्ज स्वीकृती प्रक्रियेवर युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर,जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर,जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे,तसेच ए.जे. बोराडे यांची देखरेख आहे.

भाग्यनगर कार्यालयात उत्साहाचा स्फोट उमेदवारी नोंदणीला सुरुवात भाग्यनगर येथील शिवसेना संपर्क कार्यालयात जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि जालना महापालिकेसाठी उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास अधिकृत सुरुवात झाली.सकाळपासूनच कार्यकर्त्यांचा ओघ आणि घोषणांचा गरजणारा माहोल पाहून निवडणूक सरशीसाठी शिवसेना सज्ज असल्याचे चित्र ठळक झाले आहे.

जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, तसेच आत्मानंद भक्त यांनी संयुक्त आवाहन करत सर्व इच्छुकांनी संपूर्ण माहिती व कागदपत्रांसह अर्ज दाखल करावेत असे सांगितले. कडक आणि पारदर्शक छाननी निकष स्पष्ट शिवसेनेने स्पष्ट केले आहे की उमेदवारीची निवड कडक पारदर्शक आणि काटेकोर निकषांवर होणार आहे. स्थानिक पातळीवरील पक्षकार्य जनसंपर्क व लोकनिष्ठा विकासाभिमुख दृष्टिकोन संघटनात्मक बांधिलकी या सर्व निकषांची तपासणी करूनच अंतिम उमेदवार निश्चित केले जाणार आहेत. पक्षनिष्ठा आणि लोकसेवा हाच आमचा आधार असा संदेश वरिष्ठ नेतृत्वाने कार्यकर्त्यांना दिला आहे.अर्ज सादरीकरणाची वेळ दि.२१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५,सकाळी १०ते सायं ५ संपर्क व्यक्ती जिल्हा परिषद / पंचायत समिती भाऊसाहेब घुगे जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे,रमेश



चांदर स्वीय सहाय्यक,जालना महानगरपालिका भास्करराव आंबेकर,विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त,ज्ञानेश्वर डोंगरे शिवसेनेचे संघटन पुन्हा ताठ निवडणूक लढाई अटळ उमेदवारी प्रक्रियेला मिळणारा तुफान प्रतिसाद पाहता शिवसेना पुन्हा संघटनात्मक बळ मिळवताना दिसत आहे. जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह,स्पर्धा आणि लढाऊ वृत्तीचा ज्वालामुखी पेटला आहे.

जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे आणि ए.जे.बोराडे पाटील यांनी सांगितले.

# अंबड नगर परिषद निवडणूक २०२५ मतदारराजाचे यज्ञकुंड सज्ज

## मतदान कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण पार पुढील फेऱ्यांची तयारी युद्धपातळीवर

फारुक शेख :- अंबड नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा काउंटडाऊन सुरू झाला असून १९ नोव्हेंबर रोजी अंबड तहसील कार्यालयातील सभागृहात मतदान केंद्राध्यक्ष व मतदान कर्मचाऱ्यांचे पहिले सर्वांगीण प्रशिक्षण दमदार वातावरणात पार पडले.

शिस्त,माहिती आणि निवडणूक शुचिता या तिघांवर आधारित हा प्रशिक्षण-अभियान प्रशासनाने कसोशीने पार पाडला.

तहसीलदार विजय चव्हाणांचा निर्भीड संदेश मतदान म्हणजे जबाबदारी कुठलीही चूक चालणार नाही निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार श्री. विजय चव्हाण यांनी मतदान अधिकाऱ्यांना निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा कायदेशीर तरतुदी कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या याबाबत सखोल मार्गदर्शन केले.गोपनीयता, नियमपालन,निष्पक्षता आणि मतदान दिवशी करावयाची प्रत्येक प्रक्रिया प्रशिक्षणात एकही गोष्ट ढिलाईशिवाय स्पष्ट करण्यात आली.एतच् सीलिंग, हँडलिंग आणि प्रत्यक्ष प्रशिक्षणाने अधिकाऱ्यांचा आत्मविश्वास दुणावला

प्रशिक्षणाचे लक्षवेधी मुद्दे

एतच् सीलिंगची तांत्रिक पद्धत दाखवून सांगण्यात आली मतदानादरम्यान करावयाच्या दक्षता उपायांची माहिती डउऊ प्रोजेक्टरद्वारे व्हिडिओ मार्गदर्शन प्रत्यक्ष एतच् हाताळणीचे हँड्स-ऑन ट्रेनिंग अडचणी टाळण्यासाठी रीअल-टाइम डेमो या सर्वामुळे मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण अक्षरशः फुलप्रूफ झाले. पुढील प्रशिक्षण फेऱ्या टप्प्याटप्प्याने तयारी निवडणूक प्रक्रिया निर्दोष पार पाडण्यासाठी प्रशासनाने तीन टप्प्यांचे प्रशिक्षण देण्याचे ठरवले असून दुसरे प्रशिक्षण २४ नोव्हेंबर २०२५ अंतिम प्रशिक्षण ०१ डिसेंबर २०२५ सर्व नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी उपस्थिती बंधनकारक असल्याचा दृढ इशारा तहसीलदारांनी दिला. उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी सुरू छाननीत वैध ठरलेल्या उमेदवारांना आजपासून ते २१ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत उमेदवारी मागे घेण्याची परवानगी आहे. माघार घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी निश्चित वेळेत कार्यालयाशी संपर्क साधावा. आचारसंहिता तडा दिलात तर कारवाई ठोकरूनच प्रशासनाचा इशारा मतदान कर्तव्य पार पाडताना पूर्ण निष्पक्षता,पारदर्शकता आणि शुचिता राखावी अन्यथा कोणताही उमेदवार किंवा कार्यकर्ता आचारसंहितेचा भंग करताना आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे. प्रशिक्षण कार्यक्रमात मान्यवरांची उपस्थिती संपूर्ण प्रशिक्षण सत्र जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्रीमती असीमा मित्तल उपजिल्हाधिकारी श्रीमती नम्रता चाटे आणि उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी विजय चव्हाण, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मनोज वक्रीडे हे उपस्थित होते.



# किनवट नगर परिषद निवडणूक उमेदवारांची वैध यादी जाहीर; राजकीय घडामोडींना वेग, युती आणि बंडखोरीमुळे चित्र रंजक

किनवट /प्रतिनिधी : किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची रणधुमाळी आता अंतिम टप्प्याकडे झुकत असून, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी (नमुना ४, नियम १३ अन्वये) अध्यक्षपद आणि विविध प्रभागांसाठी वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. छाननी प्रक्रियेनंतर अध्यक्षपदासाठी १५ तर विविध प्रभागांमध्ये अनेक उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मात्र, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत २१ नोव्हेंबर असल्याने त्यानंतरच लढतीचे खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

अध्यक्षपदासाठी १५ उमेदवार रिंगणात

किनवट नगर परिषदेच्या अध्यक्षपदासाठी एकूण १५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. यामध्ये प्रामुख्याने भाजपच्या पुष्पा आनंद मच्छेवार आणि महाविकास आघाडीच्या (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट व शिवसेना उबाठा) उमेदवार सौ. सुजाता विनोद यंडुलवार यांच्यात थेट लढत आहे. तरी इतर ही उमेदवारांचाही समावेश आहे.

राजकीय समीकरणे आणि धक्कातंत्र

या निवडणुकीत राजकीय पक्षांच्या निष्ठा आणि युतीमध्ये मोठे बदल पहायला मिळत आहेत:

भाजप व काँग्रेस: भाजपने स्वतंत्रीत्या ही निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असून, काँग्रेसने देखील एक अध्यक्षपद आणि १२ जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत.

महाविकास आघाडी: राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांनी आघाडी केली असून, त्यांच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. सुजाता यंडुलवार या आहेत.

पक्ष प्रवेशाचा धक्का: भाजपचे श्रीनिवास यादवराव नेम्मानीवार यांनी अचानक राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे माजी नगराध्यक्ष साजिद खान यांनी ऐनवेळी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षासोबत जाण्याची भूमिका घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

प्रभाग क्र. ४ मध्ये हायव्होल्टेज ड्रामा

माजी नगराध्यक्ष साजिद खान यांनी भाजपसोबत स्थानिक युती करत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटासाठी ९ जागा मिळवल्या आहेत. याचा मोठा फटका प्रभाग क्रमांक ४ मध्ये बसला आहे.

हृदयविकाराचा धक्का: प्रभाग ४ मध्ये ऐनवेळी उमेदवार बदलल्याने उमेदवार शेख अयाज यांच्या पतीला हृदयविकाराचा तीव्र धक्का बसला असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

तिकीट वाटपाचा गोंधळ: या प्रभागातील माजी नगरसेवक शेख अफरोज आणि कैलास भगत यांनी भाजपकडे उमेदवारी मागितली होती. मात्र, साजिद खान यांनी जागा आपल्याकडे खेचल्याने भाजपच्या इच्छुकांची कोंडी झाली. अखेर, शेवटच्या क्षणी या दोन्ही माजी नगरसेवकांनी 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' गटाची उमेदवारी मिळवण्यात यश मिळवले आहे.

माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद नांदेड प्रकाश गब्बा राठोड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षातून माजी नगराध्यक्ष साजिद खान यांची हकालपट्टी केल्याचे पत्र समाज माध्यमावर प्रसारित केले ज्यामध्ये पक्ष विरोधी कारवाया, भाजपा सोबत छुपी युती तसेच उमेदवारांची पळवापळव असे मुद्दे समाविष्ट करून सदर अहवाल खा. शरदचंद्र पवार यांना सादर करणार असल्याचे नमूद केले.

माजी नगराध्यक्ष साजिद खान यांनी यावर भाष्य करताना सांगितले की त्यांनी रीतसर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्ष सोडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मध्ये प्रवेश केला आहे.

मुस्लिम मतदारांचा रोष आणि झरीना खान यांची भूमिका

किनवट शहरात जवळपास १२,००० मुस्लिम मतदार असूनही प्रमुख पक्षांनी मुस्लिम समाजाला नगराध्यक्षपदाची उमेदवारी न दिल्याने समाजात रोष निर्माण झाला आहे. साजिद खान यांच्या पत्नी, झरीना खान यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाकडून अर्ज दाखल केला आहे. आता त्या युती धर्म पाळून माघार घेतात की निवडणूक लढवतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यांनी निवडणूक लढवल्यास निकालात मोठी कलाटणी मिळू शकते.



## गोदावरी नदीच्या पात्रात अवैध रेती उपसा करून वाहतूक करणाऱ्या

## रेती माफिया वर छापा टाकुन कार्यवाही ४५ लाखाचा मुद्देमाल जप्त

ग्रामीण पोलीसांची कारवाई

नवीन /नांदेड -गोदावरी नदी पात्रातील अवैध रित्या रेती उपसा करूण वाहतुक करणाऱ्या रेती माफियावर नांदेड ग्रामीण पोलीसांनी दोन ठिकाणी छापा कारवाई करुन एकुन ४५, ००,०००/- लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त केला असुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नांदेड पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व रेती वाहतुक करणाऱ्या लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले आहे

त्या अनुषंगाने ओमकांत चिंचोलकर पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांच्या आदेशान्वये वरील अंमलदार यांनी गोदावरी नदीपात्रात चोरुन लपुन अवैध रेती उपसा होत आहे अशा माहीतीवरुन योग्य तो सापळा लावुन दिनांक १८ नोव्हेंबर रोजी सांयकाळी ७ वाजता व रात्री ११. ४५ वा असर्जन गोदावरी नदी पात्रातुन अवैध रित्या रेती उपसा करणारे इसमावर छापा कार्यवाही करूण एक इंजीन व तिन तराफे जागीच नाश करूण, उपसा करूण किना-यावर साठवलेली ५ ब्रास रेती जप्त केली तसचे अवैध रेती वाहतुक करणारे टाटा हायवा यास अदनान गार्डन कमानी जवळ धनेगाव येथे पाच ब्रास रेती सह ताब्यात घेवुन मुद्देमाल जप्त करूण पो.स्टे.ला लावण्यात आले आहे.वरील नमुद आरोपी पैकी एकास ताब्यात घेण्यात आले असुन नमुद दोन्ही आरोपीता विरोधात कलम ३०३( २), ३ ( ५) भा.न्या.सं. सहकलम ४८ ( ७), ४८ ( ८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम प्रमाणे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

गुन्हा उघडकीस आणणारे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोहेकॉ शेख इब्राहीम, पोहेकॉ शेख सत्तार, पोहेकों मुपडे, पोहेका सूर्यकांत चाटे,पोकोंशेख जमीर,पोकों शेख आसीफ, पोकों धम्मपाल कांबळे, सर्व नेमणुक पो.स्टे. नांदेड ग्रामीण पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगीरीचे पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, यांनी सर्वांचे कौतुक करून अभिनंदन केले आहे.

# नांदेड जिल्ह्यातील गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करून कायद्याचे वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या दृष्टीकोणातून राबवीण्यात येत आहे

नांदेड : -नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखणे आणि समाजातील गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्यासाठी नांदेड पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार , यांनी कठोर पावले उचलली आहेत. वाळू तस्करी करणाऱ्या गुन्हेगारास एमपीडीए अंतर्गत राहुल कर्डिले ,जिल्हा दंडाधिकारी, नांदेड यांनी,अबिनाश कुमार पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या शिफारशी नुसार स्थानबद्ध आदेश जारी केले आहेत.

जिल्ह्यातील अवैध वाळू तस्करीस आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून सतत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमे दरम्यान अवैध वाळू उपसा व विक्री करणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येत आहे. स्थानबद्ध इसम स्वप्नील दिलीप चौदंते हा दीर्घकाळा पासून गोदावरी नदी पात्रातून वाळूची अवैधरित्या तस्करी करून चोरटी विक्री करत होता, त्याच्या या बेकायदेशीर कृत्यांमुळे नदीपात्राचे अपरिवर्तनीय नुकसान, पर्यावरणीय असंतुलन तसेच परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहेत. सदर व्यक्तीविरुद्ध यापूर्वीही गुन्हे दाखल करण्यात आलेले असून, तरीदेखील त्याने अवैध धंदे थांबविले नाही. त्याच्या या वारंवार करत असलेल्या गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सदर व्यक्तीच्या अवैध कारवाया सार्वजनिक सुव्यवस्थेस विपरीत परिणाम करत असल्याने, सार्वजनिक सुव्यवस्था व शांतता अबाधित ठेवण्याच्या



दृष्टीकोणातून सदर वाळू तस्कर स्वप्नील दिलीप चौदंते यास एमपीडीए अधिनियमा प्रमाणे स्थानबध्द करणे बाबतचा प्रस्ताव ओमकांत चिंचोलकर,पोलीस निरीक्षक, नांदेड ग्रामीण यांनी पोलीस अधीक्षक, नांदेड यांचेकडे सादर केला होता. प्रस्तावांमध्ये काही उणीवा राहणार नाहीत या करीता उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड यांनी महत्वपूर्ण कामकाज पाहीले आहे.

अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी सदर एमपीडीए प्रस्तावामधील उक्त गुन्हेगारास एक वर्षाकरीता स्थानबध्द करण्याबाबतची शिफारस मा. जिल्हादंडाधिकारी नांदेड यांचेकडे केली होती.त्यावरुन राहुल कर्डिले , जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, नांदेड पांनी सदर प्रस्तावातील नमुद गुन्हेगारास एक वर्षाकरीता हासूल मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे एमपीडीए कायद्या अंतर्गत स्थानबध्द करण्या बाबतचे दिनांक १८ नोव्हेंबर रोजी आदेश पारीत केले आहेत. गुन्हेगारांस ताब्यात घेवून हार्सेल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे बंद करण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत सराईत पणे चोरुन लपून अवैध व्यवसाय करणारे १०० पेक्षा अधिक गुन्हेगारांचे गुन्हेगारी रेकॉर्ड प्रमाणे त्यांच्यावर विविध कायद्याअंतर्गत योग्य ती प्रतिबंधात्मक कार्यवाही प्रस्तावीत आहे.त्याचबरोबर नांदेड जिल्ह्यामध्ये शांतता व सूव्यवस्था अबाधित राखण्यासाठी एमपीडीए अंतर्गत सन २०२४ मध्ये एकुण १३ रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगाराना कारागृहामध्ये स्थानबध्द करण्यात आले असून सन २०२५ या चालू वर्षामध्ये ३२ सराईत गुन्हेगारास कारागृहामध्ये 'स्थानबध्द करण्यात आले आहे. त्याचबरोबर अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी सन २४- २५ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे एकुण १४८ गुन्हेगारांना हद्दपार केले आहे. तसेच सन २०२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ प्रमाणे एकुण २२ गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले आहे. सर्व सामान्य, शांतता प्रिय नागरीकांना त्रास देणारे उपद्रवी गुन्हेगारांवर पोलीसांची बारकाईने नजर असून अशा गुन्हेगारांवर 'स्थानबध्द सारखी कठोर कार्यवाही करण्यात येत आहे

राहुल कर्डिले जिल्हादंडाधिकारी नांदेड व अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या समन्वयातून वाळू तस्करा विरुद्ध एमपीडीए कार्यवाही शक्य झाली असून, ही कार्यवाही संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे नांदेड जिल्हा आज गुन्हेगारी विरुद्ध अधिक सजग आणि सुरक्षित दिशेने वाटचाल करत असून ही कारवाई प्रशासनाच्या दृढ निश्चयाची आणि नागरिकांच्या सुरक्षेबाबतच्या कटिबद्धतेची साक्ष आहे. कायद्यापुढे कोणीही मोठा नाही, आणि जनतेची सुरक्षितता व सुव्यवस्था हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. हा संदेश अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी या कार्यवाहीतून स्पष्टपणे जनतेसमोर दिला आहे.

# लेखा विभागातील संगणक अभावी, ऑनलाईन पावत्यासाठी सर्व सामान्य नागरीकांची हेळसांड

नांदेड : - नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असलेल्या लेखा विभागातील संगणक ईतर कार्यालयात असल्याने दैनंदिन नाव परिवर्तन सह ईतर विभागातील रक्कम भरण्यासाठी आलेल्या सर्व सामान्य नागरिकांना मात्र तासोनतास थांबवून प्रदिर्घ वेळेनंतर ऑनलाईन पावत्या देण्यात येत असुन प्रशासन मात्र जाणिव पुर्व दर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत असुन तात्काळ ईतर कार्यालयात असलेला संगणक लेखा विभागात आणुन नागरीकांची होणारी गैरसोय टाळावी अशी मागणी जनतेतुन होत आहे.





नावा मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत मनपा प्रशासनाचा वतीने संबंधित विभागाने आयुक्त डॉ महेश कुमार डोईफोडे यांच्या आदेशानुसार क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत कोण कोणत्या विभागात संगणक आहेत किंवा नाही,नव्याने संगणक उपलब्ध लागणार का या बाबत सर्व्हे करून क्षेत्रीय कार्यालय सहाय्यक आयुक्त यांच्या कडून लेखी पत्र घेऊन नव्याने संगणक मागणी करण्यात आल्या नंतर सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे एक संगणक लेखा विभागा साठी मंजूर करण्यात आले परंतु या विभागासाठी देण्यात आलेले संगणक निवडणूक संदर्भाने अन्य कार्यालयात गेल्यामुळे लेखा विभागाचे कर्मचारी मात्र नाव परिवर्तन सह ,जन्म मृत्यू, नवीन घर नंबर देणे, यासह अन्य कामांसाठी भरण्यात येणारे ऑनलाईन शुल्क साठी ईतर विभागातील संगणकावर बसून आपल्या वेळेनुसार संबंधित कर्मचारी पावत्या ऑनलाईन देत असल्याने नागरिकांनी मात्र तासोनतास वाट पाहवी लागत आहे त्यामुळे सर्व समान्य नागरीकांची मोठया प्रमाणात हेळसांड होत असून .

प्रत्यक्षात मंजूर झालेला या विभागातील संगणक लेखा शाखेला उपलब्ध करून दिल्यास नागरीकांची होणारी गैरसोय दुर होऊ शकते मात्र सिडको क्षेत्रीय कार्यालय प्रशासनाने मात्र या बाबी कडे जाणिव पुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत असून तात्काळ लेखा विभागातील संगणक उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी सिडकोतील नागरीका तुंन होत आहे.



## सिडको क्षेत्रीय कार्यालय सुशोभिकरणाचे काम रखडले, काम करणारा गुत्तेदार गायब असल्याची चर्चा नागरीकांना नाहक त्रास

नवीन नांदेड - ना वा मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे यांच्या आदेशानुसार सर्वच क्षेत्रीय कार्यालय सुशोभिकरणाचे कामे हाती घेण्यात आले होते परंतु सुशोभिकरण साठी देण्यात आलेला निधी चे कमतरता पडल्या मुळे क्षेत्रीय कार्यालय सिडको येथे अर्धवट कामामुळे गेल्या अनेक दिवसांपासून काम रखडलेले असल्यामुळे संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्या सह नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत असुन बांधकाम त्वरित चालू करावे यासाठी सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी आयुक्त यांच्या कडे लेखी पत्राद्वारे कळविले आहे.

नावा मनपाच्या वतीने शहरातील सहा क्षेत्रीय कार्यालय येथे गेल्या सात ते आठ महिन्यांपूर्वी सुशोभिकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला होता यावेळी क्षेत्रीय कार्यालय सुसज्ज सह सहाय्यक आयुक्त कार्यालय, नाव परिवर्तन विभाग, लेखा विभाग , जन्म मृत्यू यासह वसुली लिपीक कक्ष, स्वागत कक्ष यांच्या समावेश होता यासाठी क्षेत्रीय कार्यालय निधी उपलब्ध करून देण्यात आला होता.



## खा.गोपछेडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शालेय साहित्य वाटप..

नवीन नांदेड - भारतीय जनता पार्टीचे राज्यसभा खासदार डॉ.अजित गोपछडे यांच्या वाढदिवसा निमित्त महात्मा गांधी निवासी अपंग शाळा सिडको ज्ञानगंगा येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि फळ वाटप आयोजक भाजपा ओबीसी जिल्हा महानगर अध्यक्ष विनोद कांचनगिरे व उपाध्यक्ष संतोष कांचनगिरे यांच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

खा.गोपछेडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सिडको येथील महात्मा गांधी निवासी अपंग विद्यालय व ज्ञानगंगा प्राथमिक शाळा येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि फळ वाटप या कार्यक्रमास जेष्ठ नेते जनार्दन ठाकूर,धिरज स्वामी, ओबीसी मोर्चा हुकुमसिंह गहलोत,माजी महिला बालकल्याण सभापती ललिता शिंदे,सिडको भाजपा महिला मंडळ अध्यक्ष विजयाताई गोडघासे ,

सुमन पवार,संतोषी भाले,सिडको व सर्व भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व मुख्याध्यापक एन. एम,वाघमारे ,शिक्षक मस्के,भासकरे, सौ.शिंदे यांच्या सह विध्यार्थी उपस्थिती होते.

## शेतजमिनीच्या बांधाच्या वादातून मसलगा गावात दोन भावावर हल्ला; अकरा जणांवर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

कंधार(प्रतिनिधी)

शेतीच्या धुऱ्याच्या वादातून वादातून कंधार तालुक्यातील मसलगा गावात शेतकरी कुटुंबाला बेदम मारहाण करण्यात आली. याप्रकरणी कंधार पोलिस ठाण्यात १२ जणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.याप्रकरणी सुरेश थोराजी वडजे, व्यंकटराव वडजे रा. मसलगा यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीनुसार, शेतीच्या धुऱ्याच्या वादातून कैलास सूर्यकांत वडजे,नितीन श्याम वडजे,भागवत यशवंत वडजे,सूर्यकांत यशवंत वडजे,भाऊसाब सूर्यकांत वडजे,ज्ञानेश्वर भागवत वडजे,माधव भागवत वडजे,सुनील श्याम वडजे,मनोहर मारुती वडजे,माधव उद्धव वडजे,सुधाकर मोतीराम वडजे यांनी दि. १५ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५.३० च्या सुमारास शेतशिवारात गस्त घालून सुरेश थोराजी वडजे आणि व्यकंटराव थोराजी वडजे यांना तुमचा संतोष देशमुख केल्याशिवाय सोडणार नाही म्हणून सदरील आरोपीने कुराड,चाकू,लोखंडी रॉड आणि लाठी काठ्यांनी बेदम मारहाण केल्याने गंभीर जखमी झाले. ११ जनावर सुरेश वडजे,व्यकटराव थोराजी वडजे यांनी १६ नोव्हेंबर २०२५ रोजी ७.५७ वाजता कंधार पो.स्टे.येथे गुन्हा नं. ३७७/ २५ दाखल केला आहे.तपास पो.नी.चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका डी.एन.गित्ते हे तपास करीत आहेत.

